महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक १२ जुलै, २०१८ / आषाढ २१, १९४० (शके)

(१) वित्त व नियोजन, वने मंत्री
(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री
(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री
(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री
(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री
(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ८८

सूर्या धरणाचे (जि.पालघर) पाणी असंख्य गावांचा विरोध असतानाही अन्यत्र वळविण्याचा निर्णय घेतल्याबाबत

(१) * ४१३४७ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाचे पाणी असंख्य गावांचा विरोध असतांनाही अन्यत्र वळविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्या धरणाचे पाणी जिल्ह्याबाहेर नेण्यासाठी पाईपलाईनचे सर्वेक्षण आणि ड्रिलिंगचे काम मेढवण आणि सोमटा या गावांच्या हद्दीत सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील शेती आणि बागायतीला पुरेसे पाणी मिळत नसल्याने येथे कायम दुष्काळी परिस्थिती असतांनाही सूर्या धरणाचे पाणी इतरत्र न वळविण्यासाठी पालघरवासियांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला असून यासंदर्भात सूर्या पाणी बचाव संघर्ष समितीने दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) खरे आहे.

सूर्या प्रकल्पातून सन १९८१ ते २०११ या कालावधीत एकूण २२६.९३ दलघमी पाणीसाठा बिगरसिंचनासाठी विविध अभिकरणासाठी आरक्षित करण्यात आलेला आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे.

(३) खरे आहे.

पालघर जिल्हा अतिपर्ज्यन्याच्या प्रदेशातील असून सूर्या प्रकल्पातून दरवर्षी सिंचनाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार पाण्याचे आवर्तन सोडण्यात येते.

सूर्या प्रकल्पातून मंजूर करण्यात आलेल्या बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे, सूर्या प्रकल्पाच्या प्रस्तावित सुधारीत जलनियोजनानुसार १४६९६ हेक्टर प्रकल्पिय सिंचन क्षमतेपैकी ६६६४ हेक्टर क्षेत्राची कपात करणे अनिवार्य ठरते. प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रातील संभाव्य कपातीस विरोध करण्यास्तव, सूर्या पाणी बचाव संघर्ष समितीमार्फत दिनांक ०३/०४/२०१८ रोजी राजभवन, मुंबई येथे मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली. सदर विषयावर मा.राज्यपाल महोदयांकडे दिनांक ०५/०५/२०१८ रोजी बैठक झाली.

(४) महाराष्ट्र राज्याच्या जलनितीत पिण्याच्या पाण्यास प्रथम प्राधान्य असल्याने पिण्यासाठी आरक्षित असलेल्या पाणीसाठ्याच्या अनुषंगाने सिंचन क्षेत्रात कपात करणे अनिवार्य आहे.

तथापि, मा.राज्यपाल महोदय यांचे बैठकीतील इतिवृतानुसार प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्याबाबत विविध विभागाचे सचिवस्तरावर त्यांचे निदेशानुसार एक संयुक्त समिती नेमण्याबाबत पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) पंचायत समिती येथे म.ग्रा.रो.ह.यो.च्या कुशल कामाच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(२) * ४१७२४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती कार्यालय, गेवराई (जि.बीड) येथे म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत कुशल कामाची देयके अदा करताना अस्तित्वात नसलेल्या (बिगर नोंदणीकृत) फर्मच्या नावे सिंचन विहिरी, रस्ते व इतर कामांची देयके सन २०११ पासून अदा केली जात असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील मंजूर असलेल्या २७१४ विहिरींपैकी १०९२ सिंचन विहिरींच्या कुशल कामांची देयके न.रे.गा. अंतर्गत संबंधित ग्रामपंचायतीकडून अदा करताना एकाच आडनावाच्या व्यक्तीच्या बनावट व खोट्या फर्मला हा निधी अदा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील व्यक्तीने यापूर्वी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातही बनावट एम.बी. रेकॉर्ड करून पैसे उचलल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गेवराई पंचायत समिती अंतर्गत न.रे.गा. मधून कुशल कामाची देयके अदा करताना बोगस आणि बनावट पावत्या जोडून निधी उचलल्याप्रकरणी व शासन निधीचा अपहार

केल्याप्रकरणी ज्या व्यक्तीच्या बँक खात्यातून निधीची उचल झाली त्याच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) हे खरे आहे.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांनी चौकशी समिती गठीत केली आहे. याबाबत चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.
(३) हे खरे नाही.
(४) गेवराई पंचायत समिती अंतर्गत नरेगा मधून कामाचे देयके अदा करताना बोगस व बनावट पावत्या जोडून निधी उचलल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांनी चौकशी समिती गठीत करुन याबाबत चौकशी सुरु आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच दोषीविरूद्ध कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या डॉक्टरांची अतिरिक्त डिग्री बोगस असल्याबाबत

(३) * ४२१८२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या चौकशीत ५३ डॉक्टरांची अतिरिक्त डिग्री बोगस असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी तसेच रुग्णांचा मेडिकल रिपोर्ट न पाहता सही करणाऱ्या ४ पॅथॉलॉजीस्टवर कारवाई करीत त्यांचेही परवाने रद्द करण्यात आल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरामध्ये आणि खेड्यात अनेक ठिकाणी बोगस डिग्रीच्या बळावर असे डॉक्टर बेकायदा दवाखान्याच्या माध्यमातून अनधिकृत व्यवसाय करीत असून या संदर्भात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून या बोगस पदवी असलेल्या डॉक्टरांची चौकशी सुरु असून महाराष्ट्र मेडिकल काऊंसिलने बोगस डिग्री असलेल्या २२ डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई केली असून जवळपास १०० डॉक्टर एमएमसीच्या रडारवर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ५३ एमबीबीएस डॉक्टरांनी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे रजिस्ट्रेशनसाठी दिलेली अतिरिक्त पदवी (पोस्ट ग्रॅज्युएट) बोगस असल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन तसेच बोगस डिग्री असलेल्या डॉक्टरांवर व बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) अंशत: खरे आहे.

५३ डॉक्टरांच्या अतिरिक्त डिग्रीच्या प्रमाणपत्रांबाबत चौकशी/सुनावणी करण्याची कार्यवाही महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून सुरू आहे.

तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून रूग्णांचा मेडिकल रिपोर्ट न पाहता सही करणाऱ्या चार पॅथॉलॉजीस्टविरुध्द दोषारोप सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील कलम २२ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलव्दारे ५३ डॉक्टरांच्या अतिरिक्त डिग्री बोगस असलेल्या संदर्भात डॉक्टरांची चौकशी/सुनावणी सुरू आहे.

तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने बोगस डिग्री असलेल्या २० डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई केली आहे.

(३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमार्फत सदर प्रकरणी चौकशी/सुनावणीची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उपळाई बुद्रुक (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या इमारती धोकादायक असल्याबाबत

(४) * ४१९६५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपळाई बुद्रुक (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जि.प. प्राथमिक शाळा म्हसोबाची वाडी व जि.प. प्राथमिक शाळा बेडगेवस्ती येथील शाळेच्या इमारती अत्यंत धोकादायक झाल्या असून विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरुन शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून पालकवर्गात भीतीचे वातावरण पसरले असून या इमारतीच्या दुरुस्तीची मागणी उपळाई बुद्रुक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) हे खरे नाही.

(३) माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक येथील जि.प.शाळा म्हसोबाची वाडी येथे ३ वर्गखोल्या उपलब्ध असून त्यापैकी २ वर्गखोल्या वापरात आहेत. तसेच बेडगेवस्ती येथे प्राथमिक शाळेसाठी २ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. दोन्ही प्राथमिक शाळेच्या प्रत्येकी १ अशा २ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१८-१९ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात शाळा दुरुस्तीसाठी अनुदान मागणी केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत (मनरेगा) अपहार झाल्याबाबत

(५) * ४१३१५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेझरी व घुबडीबीटमध्ये (ता.झरी, जि.यवतमाळ) महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत (मनरेगा) १० कोटी २९ लाख रुपयांचा अपहार झाला असून आंबेझरी व घुबडीबीट येथील दोन वनपरिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक, वन कंत्राटदार, सेवानिवृत्त वनपाल व मुख्य कंत्राटदारासह सात जणांना दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास यवतमाळ आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर करण्यात आलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे ?

श्री.जयकुमार रावल : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन, पाटण, तालुका झरी जामणी, जि.यवतमाळ येथे गु.र.क्र. २८/१४ कलम ४०९, ४६७, ४६८, ४७१ व १२०(ब) भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तपासाअंती एकूण ७ जणांना (सहा वन विभागाचे कर्मचारी व एक खाजगी कंत्राटदार) दिनांक १५ मे, २०१८ रोजी यवतमाळ आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. वन विभागाच्या पाच कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. गुन्ह्याचा सखोल तपास आर्थिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांच्यामार्फत सुरु आहे.

राज्यातील जिल्हा रुग्णालयात कर्करोगावरील उपचाराकरीता केमोथेरपीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(६) * ४२०८९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर,

श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा रुग्णालयात कर्करोगावरील उपचाराकरीता केमोथेरपीची मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये घेतला असून माहे जून पासून या योजनेचा पहिला टप्पा सुरु होणार आहे, या योजनेच्या पहिल्या टप्पयामध्ये दहा जिल्ह्यांचा समावेश असणार असून जिल्हा रुग्णालयातील फिजिशियन आणि परिचारिका यांना मुंबईतील टाटा रुग्णालयात याबाबत प्रशिक्षण देण्यात येणार असून जिल्हा रुग्णालयात केमोथेरपीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात कोकणातील एकाही जिल्ह्याचा समावेश न करण्यात आल्याने मुख्यत: रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड ह्यापैकी कोणत्याही एका जिल्ह्यात रुग्णालयाचा केमोथेरपी केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयाचा समावेश शासनाने मोफत केमोथेरपी उपचारासाठी सुविधांसाठी जाहिर केलेल्या जिल्हा रुग्णालयाच्या यादीत समावेश नसल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून राज्यातील काही जिल्ह्यात रुग्णालये नसताना देखील तेथे या युनिटचा समावेश करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत किती जिल्हा रुग्णालयांना केमोथेरपी युनिट सुरु करण्याची परवानगी देण्यात आली असून आतापर्यंत केमोथेरपीच्या उपचारांचा लाभ किती कर्करोग रुग्णांनी घेतला आहे व त्याकरीता किती खर्च करण्यात आला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने जाहिर केलेल्या जिल्हा रुग्णालयाच्या यादीत सिंधुदुर्ग व कोल्हापूर या जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.

राज्यातील १० जिल्हा रुग्णालयातील फिजिशियन व परिचारीका यांना टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या सहकार्याने प्रशिक्षण देऊन केमोथेरपीची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ठरविले असून याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(२) होय. सदर योजनेत कोकणातील जिल्हयांचा समावेश नाही. तथापि, राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या उपलब्ध निधीतून जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे रुग्णांना केमोथेरपीची मोफत सुविधा देण्यात येत आहे.

(३) सीपीआर हे कोल्हापूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालय असून ते जिल्हा रुग्णालय नसल्यामुळे या रुग्णालयांच्या यादीमध्ये कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयाचा समावेश नाही.

(४) टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या सहकार्याने १० जिल्हा रुग्णालयात केमोथेरपीचे युनिट सुरु करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून अद्याप याबाबतचे उपचार सुरु करण्यात आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बालकाश्रम चालविणाऱ्या संस्थांना महिला व बालविकास विभागामार्फत नियमबाहय पध्दतीने अनुदान वाटप केल्याबाबत

(७) * ४२०१६ ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील,

प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रविण दरेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बालविकास विभागात बालकाश्रम चालविणाऱ्या संस्थांना सन २०१७-१८ या वर्षात नियमबाहय पध्दतीने अनुदान वाटप करण्यात आल्यामुळे सुमारे सहा कोटी पंचवीस लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-१८ मध्ये ठराविक जिल्हयांतील विशिष्ट संस्थानाच आवश्यकतेपेक्षा जास्त निधी वाटप करुन अवैधरित्या पैसे कमविणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांची वसुली व अंमलबजावणी संचालनालयाकडून चौकशी करण्याची मागणी बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटनेनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या गैरव्यवहार प्रकरणी बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटनेमार्फत मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विशिष्ट संस्थाचालकांना कामे देऊन गैरव्यवहार करणाऱ्या महिला व बालविकास विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटना, लातूर या संघटनेकडून अशा आशयाचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) होय.

(४) सदर प्रकरणी आयुक्तालयस्तरावरुन पथक तयार करण्यात येवून त्यांचेमार्फत तपासणी करण्यात आलेली आहे. सदर तपासणीचे अंतरिम अहवालानुसार आढळून आलेल्या गंभीर त्रुटींबाबत संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राबविण्यात आलेला प्रेरणा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

(८) * ४१४७४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.परिणय फुके, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रेरणा प्रकल्प राबविण्यात आला या प्रकल्पांतर्गत नैराश्यग्रस्त शेतकरी व त्यांच्या कुंटुबियांना मानसोपचाराची व्यवस्था करण्यात आली परंतु यासाठी पुरेसे मानसोपचारतज्ञ व कर्मचारी नसल्यामुळे प्रेरणा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर पदांपैकी जवळपास ४० टक्केहून अधिक मनोविकार व मानसोपचारतज्ञ यांची पदे रिक्त असल्याने कागदोपत्रीच उपचार होत असल्याचे शेतकरी न्यायहक्क समितीचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांचा शोध शास्त्रोक्त पध्दतीने घेण्यासाठी तसेच उपचाराचे व उपचारानंतरचे वर्गीकरण करण्यासाठी यंत्रणा नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने प्रेरणा प्रकल्पांचा आढावा घेऊन राज्यात सदर प्रेरणा प्रकल्प सक्षमपणे राबवून राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या योजनेंतर्गत आजमितीस राज्यातील किती रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शेतकरी न्यायहक्क समितीचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

"प्रेरणा" प्रकल्पांतर्गत शेतकरी समुपदेशन व आरोग्य सेवा कार्यक्रम ऑक्टोबर, २०१५ पासून राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयांमध्ये सुरु करण्यात आला आहे. सदर प्रकल्प जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी मानसोपचार तज्ञ व मानसिक आरोग्य समुपदेशक यांच्यामार्फत आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व आशा कार्यकर्त्या यांना प्रशिक्षण देऊन राबविण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमांतर्गत नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांचा शोध शास्त्रोक्त पध्दतीने घेऊन त्यांचे वर्गीकरण करण्यात येते व आवश्यकतेनुसार समुपदेशन व उपचार करण्यात येतात. सदर प्रकल्पांतर्गत वर्धा, अमरावती, बुलढाणा, बीड, जालना येथील ५ जिल्हा रुग्णालयांमध्ये प्रत्येकी दोन मानसोपचार तज्ञ कार्यरत असून अकोला, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, औरंगाबाद, परभणी व हिंगोली येथे प्रत्येकी एक मानसोपचार तज्ञ कार्यरत आहे. यवतमाळ येथे शासकिय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये १ मानसोपचार तज्ञ उपलब्ध असून वाशिम येथे २ मानसोपचार तज्ञ उपलब्ध झालेले नाहीत. सदर १४ जिल्हयासाठी मानसोपचार तज्ञांच्या २४ पदांपैकी १७ पदे भरलेली आहेत तसेच, जिल्हास्तरीय कर्मचाऱ्यांच्या एकूण ७० पदांपैकी ६४ कर्मचारी कार्यरत आहेत. ७ मानसोपचार तज्ञांची रिक्त पदे व कर्मचाऱ्यांची ६ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर १४ जिल्हयात एकूण २०९०९ आशा कार्यकर्त्यांमार्फत एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१८ या कालावधीमध्ये सरासरी ३९,०२,०४६ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यापैकी २२,५६५ नैराश्यग्रस्त बाहयरुग्ण व ६,३६६ आंतररुग्णांनी उपचार घेतलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत

(९) * ४१६०३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागातील वि.जा.भ.ज. प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा असून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रमशाळांचे मासिक वेतन वेळेवर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये उच्च माध्यमिक १४८ आश्रमशाळांवर १४५९ कर्मचारी मंजूर असतानाही उपायुक्तांनी मान्यता नाकारल्याने अनेक शिक्षकांचे ५०% वेतन अद्यापही मिळाले नसून प्रत्यक्षात कार्य करणाऱ्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता नाकारल्यामुळे सदरहू शिक्षक विनावेतन काम करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यातील सामाजिक न्याय विभागातील वि.जा.भ.ज.च्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, वेतन सुरु केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची जिल्हानिहाय संख्या किती आहे व या सर्वांचे वेतन नियमित सुरु आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन १४५९ कर्मचाऱ्यांना मान्यता देऊन त्याना नियमित वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) अंशत: खरे आहे. काही आश्रमशाळांची वेतन देयके अनुदानित शाळांचे मुख्याध्यापकांकडून वेळेवर प्राप्त होत नसल्याने विलंब होतो. तथापि, दिनांक १६/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार दरमहा १ तारखेस वेतन अदा करण्याबाबत सर्व संबंधितांस निर्देश देण्यात आलेले आहेत.

(२) व (३) राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या पदांना वित्त विभागाच्या उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात आली नाही. त्यामुळे वित्त विभागाने सदरहू कर्मचाऱ्यांच्या पदांना वेतन अनुदान मंजूर केले नाही. त्यामुळे सदरहू आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. सदरहू न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने याचिकाकर्ता कर्मचाऱ्यांना थकित वेतनाची ५०% रक्कम अदा करण्यात आलेली आहे व तद्नंतर १००% नियमित वेतन अदा करण्यात येत आहे.

(४) १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांपैकी मा.न्यायालयात याचिका दाखल केलेल्या १३७ आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांना मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार नियमित वेतन अदा करण्यात येत असून त्यांची जिल्हानिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे :-

अहमदनगर-०४, अकोला-०४, अमरावती-०१, उस्मानाबाद-०६, औरंगाबाद-०७, कोल्हापूर-०१, गडचिरोली-०१, गोंदिया-०१, चंद्रपूर-०३, जळगांव-०४, धुळे-०२, जालना-०२, नंदुरबार-०१, नागपूर-०१, नांदेड-१७, परभणी-०६, पुणे-०४, बीड-०८, बुलढाणा-०१, यवतमाळ-१७, रत्नागिरी-०१, लातूर-१४, वाशिम-०२, सांगली-०६, सातारा-०२, सोलापूर-१८, हिंगोली-०३.

(५) राज्यातील उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या पदांना शासनाची व वित्त विभागाच्या उच्चाधिकार समितीची मान्यता नसल्यामुळे १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांपैकी पात्र आश्रमशाळांची मान्यता कायम करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार तपासणी करण्यासाठी समिती गठीत केलेली असून समितीचा अहवाल शासनास नुकताच प्राप्त झाला आहे व त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबविण्याबाबत

(१०) * ४२६८६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य नागरिकांऐवजी खाजगी कंपनी आणि विमा कंपन्यांना झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत रुपये ९ कोटी ३५ लाख लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी आरोग्य विभागाने रुपये ३ हजार ९ कोटी विमा कंपनीला अदा केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (पूर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील दारिद्रय रेषेखालील पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा योजना, शिधापत्रिकाधारक कुटुंबे आणि दारिद्रय रेषेवरील (रुपये १ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या) केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबे व शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबाना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विमा संरक्षणाव्दारे

वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (पुर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) लाभार्थी कुटुंबाच्या विमा संरक्षणासाठी विमा कंपनीस विमा हप्ता अदा करण्यात येतो. त्यानुसार दिनांक ०२ जुलै, २०१२ पासून माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत सर्व पॉलिसी वर्षातील ७ कोटी ६८ लक्ष लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी राज्य आरोग्य हमी सोसायटीने सेवाकरांसहित रुपये २७७८.७६ कोटी विमा कंपनीस अदा करण्यात आलेले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना ही शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज भरून घेऊन वैयक्तिक लाभार्थ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी जाहीर करण्यात आलेली आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ खाजगी कंपनी आणि विमा कंपन्याना देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय रुग्णालयांचे खाजगीकरण करण्याच्या प्रस्तावाबाबत

(११) * ४१३३७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयामध्ये अपुरी साधनसामुग्री आणि मनुष्यबळाचा अभाव यावर उपाय म्हणून गुजरातच्या धर्तीवर सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर ३०० खाटांचे (बेड) शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालय खाजगी संस्थांना चालविण्यास देण्याचे धोरण निश्चितीसाठी शासनाने माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने आपला अहवाल तीन महिन्यात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य जनतेस सवलतीच्या दरात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी कार्यान्वित असलेल्या शासकीय रुग्णालयाचे खाजगीकरण करण्याची कारणे काय असून सद्या मोफत मिळत असलेल्या सेवेपासून गरीब रुग्णांना वंचित रहावे लागणार असल्याने राज्य शासकीय कर्मचारी संघटनेने उक्त निर्णयाला विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुजरात शासनाचा सदर प्रयोग अपयशी असताना राज्यात वैद्यकीय सेवेचे खाजगीकरण न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, उक्त त्रिसदस्यीय समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्यातील ३०० खाटांच्या शासकीय रूग्णालयाशी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नीत करून सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर खाजगी संस्थेस चालविण्यासाठी देण्यासंदर्भात शासनाचे धोरण निश्चित करण्याकरीता दिनांक २४/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीस शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. सदर अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. काही कर्मचारी संघटनांनी सदर शासन निर्णयास विरोध दर्शविला आहे.
(४) समितीकडून कार्यवाही सुरु आहे.

राज्यात इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांवरील अनुदान केंद्र शासनाने बंद केल्याबाबत

(१२) * ४१२८४ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय तसेच वित्त आणि विकास महामंडळाच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांवरील रुपये २८ कोटी थकीत असल्याने केंद्र शासनाने सहा योजनांचे अनुदान सन २०१५-१६ पासून बंद केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे मागील कर्ज वसूली झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली तसेच कर्ज वसूली करण्याबाबत व केंद्र शासनाकडून निधी परत मिळविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेकडून त्यांच्या सहा योजनांकरीता या महामंडळास कर्ज निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. राष्ट्रीय महामंडळाच्या परतफेड धोरणानुसार थकीत रक्कम परतफेड न झाल्यामुळे राष्ट्रीय महामंडळाकडून कर्ज उपलब्ध झाले नाही.

(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत नियमानुसार विविध मार्गाने कर्ज वसूली करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत असून याकरीता मागील वर्षापासून विभागनिहाय जिल्हा व्यवस्थापकांच्या आढावा बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे.

राष्ट्रीय महामंडळाची माहे डिसेंबर, २०१७ अखेरची थकीत कर्ज रक्कम एकरक्कमी परतावा योजनेनुसार लवादाच्या प्रकरणामध्ये झालेल्या निवाड्याप्रमाणे महामंडळाकडून दिनांक ०७ जून, २०१८ रोजी राष्ट्रीय महामंडळास परतफेड करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामंडळाकडे कर्ज निधी मिळविण्याबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल.

राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील मुलींना अस्मिता योजनेंतर्गत सॅनिटरी नॅपकिन पुरविणेबाबत

(१३) * ४१७०१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४११७७ ला दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वय वर्षे ११ ते १९ या वयोगटातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलींना दिनांक १ मार्च, २०१८ रोजी सॅनिटरी नॅपकिन अस्मिता योजनेंतर्गत माफक दरात पुरविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत फक्त जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलींनाच सॅनिटरी नॅपकिन पुरविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांव्यतिरिक्त खाजगी व्यवस्थापनाच्या संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळेतील वय वर्षे ११ ते १९ या वयोगटातील मुलींना माफक दरात अस्मिता योजनेंतर्गत सॅनिटरी नॅपकिन पुरविणेबाबत सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील मुलींना अस्मिता योजनेंतर्गत माफक दरात सॅनिटरी नॅपकिन पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील सर्वच किशोरवयीन मुलींना रुपये ५/- या दराने सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. त्यानुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

शासनाच्या मंत्रालयीन विभागातील सरळसेवा व पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याबाबत

(१४) * ४१८४२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ३५ मंत्रालयीन विभागातील अ, ब, क व ड या संवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाची १ लाख ७७ हजार २५९ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध संवर्गातील मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने त्याचा कामावर दुष्परिणाम होत असून उक्त पदांपैकी ७२ हजार पदे येत्या दोन वर्षात भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ७२ हजार पदे भरण्याच्यादृष्टीने शासनाने काय नियोजन केले आहे तसेच उर्वरित ५२५९ रिक्त पदे किती कालावधीत भरण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) माहे डिसेंबर, २०१६ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार राज्य शासनाच्या ३५ मंत्रालयीन विभागातील अ,ब,क व ड या संवर्गात एकूण १०,५९,५१४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एकूण १,५६,७४९ इतकी पदे रिक्त आहेत.

(२) व (३) होय, हे खरे आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढविणे तसेच, ग्रामीण भागात अत्यावश्यक नागरी सेवा पुरविण्याकरीता ७२ हजार रिक्त पदे भरण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी विधानभवनात आश्वासित केले आहे. त्यानुसार सदर पदे दोन टप्प्यात भरण्यात येणार असून शासनाने रिक्त पदे भरण्यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक १६/०५/२०१८ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने रिक्त पदे भरण्याबाबत विभागास अधिकार प्रदान केलेले आहेत. राज्य शासनाच्या

विविध विभागातील व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या प्रस्तावाबाबत प्रकरणपरत्वे साकल्याने विचार करुन अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व अमुस/प्र.स (व्यय), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने रिक्त पदे भरण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनांतर्गत (जि.नागपूर) सिंचन विहिरींचे बांधकाम करण्याबाबत

(१५) * ४२१३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत (जि.नागपूर) सिंचन विहिरींच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता मिळूनही काम सुरु करण्यास परवानगी न दिल्याने १५१३ विहिरींची कामे बंद पडल्याची घटना माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहिरींचे बांधकाम सुरु करण्याची परवानगी मिळण्याकरीता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी सचिव (रोहयो) यांच्याकडे दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी पत्रव्यवहार करुन परवानगी मागितली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विहिरींच्या बांधकामास कधीपर्यंत परवानगी देऊन सुरुवात करण्यात येणार आहे,

(४) तसेच, विहिरींच्या बांधकामास परवानगी देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) नाही, हे खरे नाही.

अद्याप सदर सिंचन विहिरींचे काम सुरु केलेले नसल्याने ते बंद पडण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक २१ एप्रिल, २०१८ च्या पत्रान्वये शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे.

(३) शासन पत्र दिनांक २६ जून, २०१८ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण भागात नवीन आरोग्य उपकेंद्रे सुरु करण्याबाबत

(१६) * ४१९०४ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागामधील लोकांमध्ये उच्च रक्तदाब, क्षयरोग आणि कर्करोग यासारख्या आजारांच्या रुग्णावर वेळीच निदान आणि उपचार व्हावेत यासाठी शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आरोग्य उपकेंद्रे (Health Wellness Centre) सुरु केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ मे, २०१८ पर्यंत किती आरोग्य उपकेंद्रे सुरु करण्यात आली असून उक्त आरोग्य उपकेंद्रावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ३१ मे, २०१८ पर्यंत २८० आरोग्य उपकेंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. सदर उपकेंद्रांवर सन २०१६-१७ मध्ये रुपये १२.७७ लक्ष, सन २०१७-१८ मध्ये रुपये ४५२.२५ लक्ष व सन २०१८-१९ (माहे मे, २०१८ पर्यंत) रुपये ५३.२३ लक्ष असे एकूण रुपये ५१८.३४ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व मेयो रूग्णालय वसतिगृहाची कामे पूर्ण करण्याबाबत

(१७) * ४२३७७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व मेयो रूग्णालयातील नविन निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम गत १ वर्षापासून पूर्ण होवूनही विद्युतीकरणाचे काम व इतर सोई-सुविधा पूर्ण करण्यात न आल्याचे दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहाच्या इमारतीत लागणाऱ्या आवश्यक सोई-सुविधा व विद्युतीकरणाची कामे पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वसतिगृहाच्या इमारतीत लागणाऱ्या आवश्यक सोई-सुविधा व विद्युतीकरणाची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हा परिषद पंचायत विभागामधील उपमुख्य कार्यपालन अधिकाऱ्यास लाच स्वीकारताना पकडल्याबाबत

(१८) * ४२५३६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद पंचायत विभागामधील उपमुख्य कार्यपालन अधिकारी यांना लाच स्वीकारताना पकडण्यात आल्याचे दिनांक १२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सापळा कारवाई करण्यात आल्यावर दिनांक १६ मे, २०१८ शासन आदेशान्वये श्री.अरुण सखाराम निंबाळकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), (गट-अ) यांना दिनांक ११/०५/२०१८ पासून मानिव निलंबित करण्यात आले आहेत. सदर प्रकरण अन्वेषणाधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

ग्रामपंचायत (जि.रत्नागिरी) येथे ग्रामविद्‌युत सेवक म्हणून आयआयटी पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत

(१९) * ४१८६५ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यामधील ३ हजार लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविद्‌युत सेवक म्हणून आयआयटी पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याचे आदेश माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये शासनाने जारी केले असताना रत्नागिरीत ३००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या

ग्रामपंचायतीची संख्या ७५५ इतकी असून त्यापैकी केवळ ७० ग्रामपंचायतींमध्ये ग्रामविद्युत सेवकांची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ६८५ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामविद्युत सेवकांची नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उर्वरित नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार ३००० लोकसंख्यापर्यंतच्या ग्रामपंचायतींमध्ये आय.टी.आय. (इलेक्ट्रीकल-विद्युततंत्री) किंवा इलेक्ट्रीकल या विषयामध्ये जास्त शिक्षण घेतलेल्या पात्र व्यक्तींची ग्रामविद्युत व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ८४ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविद्युत व्यवस्थापक नियुक्त करण्यात आलेले आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ३००० लोकसंख्यापर्यंतच्या ग्रामपंचायतींची एकूण संख्या ७५८ इतकी आहे. त्यापैकी ८४ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविद्युत व्यवस्थापक नियुक्त करण्यात आलेले आहेत. उर्वरित ६७४ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविद्युत व्यवस्थापकांची नियुक्ती करण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातून पात्र उमेदवार प्राप्त होण्यासाठी जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच दिनांक २६ जानेवारी, २०१७ व माहे नोव्हेंबर, २०१७ च्या ग्रामसभांतून या विषयाची माहिती ग्रामस्थांना देवून पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज ग्रामपंचायतीकडे देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावरही नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच ग्रामपंचायत व तालुकास्तरावरुन प्रयत्न करुनही या ६७४ ग्रामपंचायतींमध्ये पात्र उमेदवारांचा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविद्युत व्यवस्थापक नियुक्त करण्यासाठी प्रयत्न करुनही पात्र उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाच्या जलसंधारण विभागाने तयार केलेल्या जल आराखड्यामध्ये अनेक त्रुटी असल्याबाबत

(२०) * ४२३२२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलसंधारण विभागाने समन्यायी पाणी वाटपाकरीता तयार केलेल्या जल आराखड्यामध्ये अनेक त्रुटी असून सदर जल आराखडा संपूर्ण माहितीच्या आधारे पध्दतशीरपणे सर्व्हेक्षण न करता तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जल आराखड्यामध्ये दुष्काळी भागाचा विचार करण्यात आला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समन्यायी पध्दतीने पाणीवाटप करण्यासाठी नेमलेल्या तज्ञ समितीने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे,

(४) तसेच, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जल आराखड्यांमध्ये सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे खरे नाही.

दिनांक १९/११/२०१५ रोजी झालेल्या राज्य जल परिषदेच्या दुसऱ्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार दिनांक १२/०४/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गोदावरी एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याच्यादृष्टीने श्री. के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली.

सदर तज्ञ समितीचा अहवाल व गोदावरी नदी खोरे अभिकरणाकडून सादर करण्यात आलेला गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखड्यास दिनांक ०७/०८/२०१७ रोजी झालेल्या राज्य जल मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/११/२०१७ रोजी झालेल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा गोदावरी खोरे यास मान्यता देण्यात आली.

गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखड्याच्या धर्तीवर कृष्णा खोरे, तापी खोरे, नर्मदा खोरे, पश्चिम वाहिनी नदी खोरे व महानदी खोऱ्याचे एकात्मिक जल आराखड्यास राज्य मंडळाची मान्यता प्राप्त करुन राज्य जल परिषदेच्या दिनांक २२ जून, २०१८ रोजीच्या पाचव्या बैठकीत अंतिम मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील जीटी रुग्णालयात डॉक्टरांना मारहाण झाल्याबाबत

(२१) * ४१७८७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोकुळदास तेजपाल (जीटी) रुग्णालयातील आपत्कालीन विभागातील डॉक्टरांना मारहाण करुन धमकाविल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केईएम रुग्णालयातील डॉक्टरांना मारहाण झाल्यानंतर शासनाने रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करुनही सदर रुग्णालयात डॉक्टरांवर हल्ला केल्याचा प्रकार घडल्याने याप्रकरणी चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच डॉक्टरांच्या सुरक्षतेबाबत कोणती कार्यवाही केली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) होय.

(२) जीटी रूग्णालयामध्ये घडलेल्या प्रकाराबाबत आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे एफआयआर नोंदविला असून रूग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. तसेच सुरक्षा रक्षकांच्या संरचनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(३) लागू नाही.

मुंबईतील जे.जे. रुग्णालयात चुकीच्या उपचार पध्दतीमुळे बालकाचा मृत्यू झाल्याबाबत

(२२) * ४१५८५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांच्या चुकीच्या उपचार पध्दतीमुळे एका २२ महिन्याच्या बालकाचा दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी मृत्यू झाला, अशी तक्रार वाळीव पोलीस ठाण्यात वसिम शेख यांनी दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्वानदंश झालेला नसताना रेबीजची लक्षण या निखळ अंदाजाचा उपचार केल्याने दाखल केलेल्या बाळाचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न भाग क्र. (१) व (२) च्या संदर्भात नमूद करण्यात येते की, सर ज.जी.समूह रुग्णालयातील बालरोगचिकित्साशास्त्र विभागात दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी २२ महिन्याचा रुग्ण दाखल करण्यात आला होता. सदर रुग्णाच्या वडीलांनी दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी सर ज.जी.मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई येथे तक्रार दाखल केली होती. सदर रुग्णाचा दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी मृत्यू झाला. याविषयी संस्थास्तरावर ५ सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार संबधित रुग्णावर रुग्णालयीन चिकित्सा पध्दतीप्रमाणे सर्व प्रकारचे आवश्यक उपचार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) लागू नाही.

यवतमाळ जिल्हा परिषदेतील अंगणवाडी केंद्र चालविण्याकरीता स्वतंत्र इमारती उभारण्याबाबत

(२३) * ४२२२० श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या २४६० अंगणवाड्यांपैकी २८७ अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नसल्याने त्या भाड्याच्या इमारतीमध्ये चालविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नसल्याने त्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजुरी घेण्याचेदृष्टीने शासनाने काय प्रयत्न केले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही, हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत नियमित २४६० व मिनी ३५५ अशा एकूण २८१५ अंगणवाडी केंद्र चालविण्यात येतात. त्यापैकी २५२८ अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारती आहेत. उर्वरित २८७ अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नाही. परंतु त्या भाड्याच्या इमारतीमध्ये चालविण्यात येत नसून सदर केंद्र समाज मंदिर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या रिकाम्या वर्गखोल्या, ग्रामपंचायत इत्यादी ठिकाणी भरविण्यात येत आहे.

(२) सदर प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांचेकडे महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०१७ नुसार महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे कार्यालयाचे दिनांक ३०/०१/२०१८ चे पत्रानुसार सादर करण्यात आला आहे.

(३) दरवर्षी जिल्हा नियोजन समितीकडे असलेल्या निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात येतो

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे धाऊर (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील शिव रस्त्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(२४) * **४२१७४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाऊर (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे शिवरस्ता तयार करणे या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१४ ते दिनांक २१ एप्रिल, २०१४ या कालावधीत निविदा प्रक्रिया राबवून सदर कामाचा कार्यादेश मे.जगशांती मजूर सहकारी संस्था, नाशिक यांना देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेने धाऊर शिवरस्त्याचे काम न करता अधिकाऱ्यांच्या संगनमताने लाखो रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) धाऊर शिवरस्ता तयार करणे ता.नाशिक या कामास लेखाशिर्ष ३०५४, ०३६३ आदिवासी उपयोजना (किमान गरजा) अंतर्गत २४/१०/२०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २३/०२/२०१४ ते दिनांक २९/०४/२०१४ या कालावधीत धाऊर शिव रस्ता तयार करणे ता.दिंडोरी या कामाची निविदा कार्यवाही करुन चेअरमन जगशांती मजुर सह.सं.मर्या., ता.जि.नाशिक यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

(३) व (४) हे खरे नाही. कार्यकारी अभियंता, इवद विभाग क्र. १, जि.प. नाशिक यांनी दिनांक ०१/११/२०१३ अन्वये शुध्दीपत्रक काढून धाऊर शिव रस्ता तयार करणे ता.नाशिक ऐवजी धागुर शिवरस्ता तयार करणे ता.दिंडोरी असा कामाच्या नावात बदल केला आहे.

धागुर शिवरस्ता तयार करणे ता.दिंडोरी हे काम दिनांक २६/०२/२०१५ रोजी पूर्ण होवून अंतिम देयक अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

घाटीवडे (ता.दोंडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे जंगली हत्तींनी पिकांचे व बागायतदारांचे नुकसान केल्याबाबत

(२५) * ४२४९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७१३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटीवडे (ता.दोंडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे जंगली हत्तींनी पिकांचे व बागायतदारांचे प्रंचड प्रमाणात नुकसान केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यात कर्नाटकमधून आलेल्या जंगली हत्तींमुळे शेतपिकांचे, बागायतीचे व मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे शेतकरी हवालदील झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वन्य हत्तींपासून शेतपिकांव्यक्तिरिक्त अन्य मालमत्तेची हानी झाल्यास नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेऊन तसेच हत्तींना हिसकावून लावण्यासाठी कर्नाटक शासनाची मदत घेण्यात येणार असल्याचे मा.वन मंत्री महोदयांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील शेतकऱ्यांना हत्तीपासून होणाऱ्या नुकसानाची योग्य भरपाई देऊन जंगली हत्तींना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) मौजे घाटीवडे, ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग येथे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वन्यहत्तींपासून शेतपीक नुकसानीची ८ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित व्यक्तींना एकुण १,८०,४००/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) वन्यहत्तींपासून शेतपिकांव्यतिरिक्त अन्य मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधितांस नुकसान भरपाई देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी-०३.१८/प्र.क्र.८७ (भाग-१)/फ-१ दिनांक २३ मार्च, २०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

शासन पत्र क्र. डब्ल्युएलपी-०३.०८/प्र.क्र.८९/फ-१ दिनांक २३/०३/२०१८ अन्वये हत्ती पकडण्याच्या प्रशिक्षणाकरीता महाराष्ट्र वन विभागातील संबंधित वन अधिकारी/कर्मचारी यांना कर्नाटक राज्यात पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यात हत्ती या वन्यप्राण्यामुळे शेतीचे होणारे नुकसान टाळण्याकरीता उपाययोजना सुचविण्यासाठी शासन निर्णय क्र. डब्ल्युएलपी-०३.०८/प्र.क्र.८७(भाग-१)फ-१ दिनांक १९/०३/२०१८ अन्वये समिती

स्थापित करण्यात आली आहे. सदर समितीव्दारे अंतिम अहवाल शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

वन्यप्राण्यांपासून नुकसान होवू नये यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.
- काही क्षेत्रात वनहद्दीवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले असून Rescue Team तयार करण्यात आली आहे.
- मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्यादृष्टीने वन अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

- वनावरील अवलंबन कमी करण्याच्यादृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.
- परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाण्याच्या सिव्हील रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याबाबत

(२६) * ४१३५९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्याच्या सिव्हील रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरमध्ये दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ रोजी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने मागील दोन ते तीन महिन्यापासून ऑपरेशन थिएटर बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम विभाग व रुग्णालय प्रशासनाच्या अनास्थेमुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत असून, रुग्णालयात येणाऱ्या अनेक रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी मुंबईला जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयातील बंद पडलेले ऑपरेशन थिएटर सुरु करण्याबाबत कोणती केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) ठाणे सामान्य रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरमध्ये दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ रोजी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने दिनांक २ मे, २०१८ पर्यंत सदर ऑपरेशन थिएटर दुरुस्तीकरीता बंद होते. तथापि रुग्णालयातील लहान शस्त्रक्रियागृहात पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली होती आणि या कालावधीत २८१ मोठ्या शस्त्रक्रिया व १० लहान शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.
(३) शस्त्रक्रियागृहाची सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग ठाणे यांचेकडून दुरुस्ती करण्यात आली असून दिनांक ३ मे, २०१८ पासून सदर शस्त्रक्रिया गृह पूर्ण क्षमतेने सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा व वाशिम या चार जिल्ह्यांच्या जलसिंचनाबाबत

(२७) * ४२५१० श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा व वाशिम या चार जिल्ह्यांच्या सिंचन क्षेत्रातील भौगोलिक अनुशेष दूर करण्याचे चालु आर्थिक वर्षातील उद्दीष्ट फक्त दहा टक्केच साध्य झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचनाचा ७६ हजार ३५७ हेक्टर भौगोलिक अनुशेष दूर करण्याचे नियोजन करण्यात आले असून प्रत्यक्षात ६ हजार ६६९ हेक्टर इतकेच अनुशेष निर्मूलन जलसंपदा विभागाने केले असल्याचे निदर्शनास आले असून निर्देशांक व अनुशेष समितीने दिनांक १ एप्रिल, १९९४ रोजी सिंचन क्षेत्रातील प्रदेशनिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील सिचंन क्षेत्रातील आर्थिक अनुशेष दुर झाला असला तरी भौगोलिक अनुशेष कायम आहे याकरीता शासनाकडून दरवर्षी आर्थिक तरतूद होत असली तरी विविध प्रलंबित सिंचन प्रकल्प आणि त्याची वाढलेली किंमत यामुळे भौगोलिक अनुशेष दुर करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भासोबत मराठवाड्यातही भौगोलिक व आर्थिक अनुशेष असल्यामुळे सिंचन प्रकल्प मार्गी लागत नाहीत तसेच विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सिंचन प्रकल्प मार्गी लागण्याबाबत व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) व (२) निर्देशांक व अनुशेष समितीची अमरावती प्रदेशातील शिल्लक भौतिक अनुशेष निर्मुलनाची कार्यवाही प्रगतीपथावर असून सन २०१७-१८ मध्ये ७६,३५७ हेक्टर रब्बी समतुल्य अनुशेष निर्मुलनाचे उद्दिष्टाच्या तुलनेत जून, २०१८ अखेर सुमारे ११,००० हेक्टर रब्बी समतुल्य इतके साध्य होणे अपेक्षित आहे. चालू आर्थिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये ३८,००० हेक्टर रब्बी समतुल्य अनुशेष निर्मूलनाचे उद्दिष्ट आहे.

(३) अनुशेष निर्मूलनासाठी हाती घेतलेल्या प्रकल्पांना भेडसवणाऱ्या विविध अडचणी सोडवून निर्मूलनाची कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) अंशत: खरे आहे. मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याचा मा.राज्यपाल यांच्या २०१८-१९ च्या निदेशात शिल्लक भौतिक अनुशेष १५,१६० हेक्टर र.स.तु. आहे. तांत्रिक पदे ७५ टक्के तर अतांत्रिक पदे ६० % भरली असून गरजेनुरुप कंत्राटी स्वरुपात अनुशेष जिल्ह्यांमध्ये पदे भरण्यास मान्यता आहे.

कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील (सीपीआर) रिक्त पदे भरण्याबाबत

(२८) * ४२४०७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात (सीपीआर) मागील पाच वर्षापासून १८७ पदे रिक्त असल्यामुळे सामान्य नागरिकांना आरोग्य सेवा वेळेवर व नियमित मिळत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१), (२) व (३) कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात (सीपीआर) ११३४ पदे मंजूर असून त्यापैकी ९०३ पदे भरलेली आहेत तर २३१ पदे रिक्त आहे. सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

पुसद (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रांतर्गत जिओ केबलकरीता, राखीव वनात शासनाची पूर्व परवानगी न घेता खोदकाम केल्याबाबत

(२९) * ४१२६४ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात पुसद वनपरिक्षेत्रांतर्गत जिओ केबलकरीता, राखीव वनात शासनाची पूर्व परवानगी न घेता खोदकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राखीव वनात खोदकाम करतांना वन जमीन संवर्धन १९८० चा भंग करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाची पूर्व परवानगी न घेता, खोदकाम करू देणाऱ्या उपवनसंरक्षक पुसद व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१), (२) व (३) मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, नागपूर यांनी पुसद वन विभागातील मारवाडी वनपरिक्षेत्रांतर्गत लाखी नियतक्षेत्रातील राखीव वनात शासनाची पूर्व-परवानगी न घेता खोदकाम केल्याचे दिनांक २५/०७/२०१७ रोजी निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी पंचनामा करून भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१), ५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरण दिनांक २६/०९/२०१७ रोजी मा.प्रथम श्रेणी सत्र न्यायालय, पुसद यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

सदर प्रकरणी उपवनसंरक्षक, पुसद यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून वन जमिनीवर झालेल्या अनधिकृत खोदकामाच्या अनुषंगाने संबंधित क्षेत्र सहायक व वनरक्षक यांना ताकीद देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरीता ०.११८ हे. राखीव वन जमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्यास राज्य शासनाने दिनांक ११/०९/२०१७ रोजी तत्वत: मंजूरी प्रदान केली आहे. केंद्र शासनाने वनभंगाच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या दिनांक २९/०१/२०१८ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरून प्रकल्प यंत्रणेकडून वनभंगाकरीता दंडात्मक रक्कम, नक्त वर्तमान मूल्य (Net Present Value) व त्यावर १२% व्याज अशी एकूण रुपये १,११,५२१/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जलयुक्त शिवार योजना प्रभाविपणे राबविण्याबाबत

(३०) * ४२११५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजना सरासरी ४५ टक्के राबविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजना योग्य प्रकारे न राबविल्यामुळे शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) हे खरे नाही. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते २०१७-१८ पर्यंत निवडलेल्या १६५२१ गावातील ५,५५,१५७ कामांपैकी ५,१६,३५१ म्हणजे ९३ % कामे पूर्ण झालेली आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मु.पो. पाते पिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(३१) * ४२६१९ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २९०९२ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. पाते पिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील मुख्य रस्ता ते बौध्दवाडी या दरम्यानचा रस्ता दगड-मातीचा असून सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याने वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रूग्णाचे हाल होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुख्य रस्ता ते बौध्दवाडी या रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०१६-१७ अंतर्गत रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमामध्ये प्रश्नांकित पाते पिलवली तर्फे वेळंब बौध्दवाडी विठ्ठलवाडी ग्रामीण मार्ग क्र. १९१ च्या साखळी क्र. ०/०० ते १/५०० मधील डांबरी नुतनीकरणाचे रुपये १०.०० लक्षचे काम मंजूर करण्यात आले होते.

परंतु पाते पिलवली तर्फे वेळंब बौध्दवाडी विठ्ठलवाडी ग्रामीण मार्ग क्र. १९१ या रस्त्याच्या पुढे असलेला पिलवली तर्फे वेळंब गवाणवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १९२ हा रस्ता म्हणजेच ग्रामीण मार्ग क्र. १९१ असल्याच्या धारणेतून ग्रामीण मार्ग क्र. १९१ या रस्त्याऐवजी जिल्हा परिषदेकडून ग्रामीण मार्ग क्र. १९२ या रस्त्यावर खडीकरण व डांबरीकरण झाले असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

उपरोक्त स्थिती पहाता सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन अहवाल पाठविण्याबाबत उपआयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(३२) * ४१५४० श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील उनखेड-वाई संग्राहक तलाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी अन्यायाविरोधात आणि प्रलंबित विविध मागण्यांच्या पुर्ततेसाठी दिनांक ७ मे, २०१८ रोजीपासून अर्धनग्न आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुर्तिजापूर तालुक्यातील प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांकडून अत्यल्प दराने शेतजमिनी खरेदी करण्यात आल्या असून जमिनीची खरेदी होण्याच्या अगोदरच प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) होय.

(२) नाही. प्रकल्पासाठी लागणाऱ्या आवश्यक शेत जमिनींची खरेदीसाठी महसूल विभागाचे परिपत्रक क्र. एलक्युएन १८/२००४/ प्र.क्र.१६२/अ-२ दिनांक ०६/०६/२००६ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार खरेदीची पध्दत अंवलबण्यात आली आहे. सदर खरेदी त्या त्या वेळी असणाऱ्या रेडीरेकनरच्या दरानुसार करण्यात आली आहे. तसेच सदर कामास दिनांक १६/०३/२०११ रोजी सुरुवात झालेली असून त्यापूर्वी धरण बांधकाम सुरु करण्यासाठी ६.५७ हे. जमीन ताब्यात घेण्यात आली. त्यासाठी सरासरी दर ७.०२ लक्ष प्रति हे. एवढा देण्यात आला आहे. तद्नंतर बुडीत क्षेत्रातील उर्वरित जमीन आवश्यकतेनुसार ताब्यात घेण्यात आली.

(३) प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत मा.पालकमंत्री, अकोला यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/०५/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मागण्यांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे निश्चित झाले. त्यानुसार जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांचे पत्र दिनांक १५/०५/२०१८ अन्वये महसूल व वन विभागाकडे प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत मार्गदर्शन मागविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सबला योजना व अमृत आहार योजनेपासून आदिवासी भागातील लाभार्थी वंचित असल्याबाबत

(३३) * ४३४१४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अनेक योजनांचे संलग्नीकरण आधारकार्डाशी करण्याची सक्ती केंद्र शासनाने केल्यामुळे राज्यातील सबल योजना व अमृत आहार योजनेतील आदिवासी भागातील लाखो बालकांचे नुकसान होऊन त्यांना पोषण आहारापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या सबल व किशोरी शक्ती योजना ही राज्यातील ११ ते १८ वयोगटाच्या किशोरवयीन मुलींसाठी राबविण्यात येत असल्याने त्या अंतर्गत पोषण आहार लोहयुक्त गोळ्या व जंतनाशक गोळ्या तसेच आरोग्याची नियमित तपासणी केली जाते व डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत आदिवासी भागातील कुपोषणाचा सामना करण्यासाठी ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना आठवड्यातून ४ वेळा अंडी व शाकाहारी मुलांना २ केळी असा आहार २१ लाख ६९ हजार मुलांना देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत आतापर्यंत किती कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आधारकार्डच्या सक्तीमुळे बालकांना देण्यात येणारा पोषण आहार बंद होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर योजनेंतर्गत आतापर्यंत रुपये १७७.७७ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(४) या याजनेंतर्गत आधारकार्डाच्या सक्तीमुळे बालकांना देण्यात येणारा पोषण आहार बंद होऊ नये यासाठी आधार कार्ड नसल्यास लाभार्थ्यांचा जन्म तारखेचा दाखला, रेशन कार्ड, राज्य शासनाकडून प्रमाणित केलेले ओळखीबाबतचे प्रमाणपत्र, पेंशनकार्ड, ECHS अथवा ESIC कागदपत्रांच्या आधारे लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा याबाबत आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पाचल (जि.रत्नागिरी) विभागातील धरण प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(३४) * ४३४५९ श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल (जि.रत्नागिरी) विभागातील कोट्यवधी रुपये खर्च करून देखील अर्जुना मध्यम प्रकल्प, काजीर्डा येथील जामदा प्रकल्प, ताम्हाणे तळवडे, वाळवड व पाचल येथील प्रकल्प सद्य:स्थितीत अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक वर्षे धरणांची कामे प्रलंबित असून या धरणांच्या पाण्याचा वापर शेतकऱ्यांना करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्प पूर्ण करून शेतकऱ्यांना पाण्याचा पुरवठा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प, जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प, तळवडे लघु पाटबंधारे प्रकल्प व ताम्हाणे (चव्हाणवाडी) लघु पाटबंधारे प्रकल्प हे बांधकामाधीन प्रकल्प आहेत. तसेच पाचल येथील दिवाळवाडी लघु पाटंबधारे प्रकल्प हा पूर्ण झालेला प्रकल्प आहे. वाळवड लघु पाटबंधारे प्रकल्प हा मृद व जलसंधारण विभागाकडील प्रकल्प आहे.
(२) वरीलपैकी अर्जुना व तळवडे प्रकल्पामध्ये पाणीसाठा करण्यात येत असून जामदा व चव्हाणवाडी प्रकल्पांमध्ये अद्याप पाणीसाठा झालेला नाही.
(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनांतर्गत उपलब्ध निधीतून डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तळवडे प्रकल्पाचे २२९ हे. क्षेत्र अर्जुना प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरुन बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे सिंचन करण्याचे नियोजन आहे. जामदा व चव्हाणवाडी प्रकल्पांची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पाटबंधारे व सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

(३५) * ४३५०८ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या खाडीपट्टयातील १२ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या नागेश्वरी धरणाचे काम निधी अभावी १३ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणचे पाटबंधारे प्रकल्प निधी अभावी प्रलंबित असून काही प्रकल्प अर्धे तर काही शेवटच्या टप्प्यात असून या प्रकल्पांच्या मुळ किंमतीत दहा-दहा पटीने वाढ झाली आहे तसेच सदरहू कामे निर्धारित वेळेत पूर्ण होत नसल्याने पिण्याचे पाणी, सिंचन यापासून येथील शेतकरी वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागेश्वर धरणाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून शेवटच्या टप्प्यातील कामासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करुन खाडीपट्टयातील पाण्याचा दुष्काळ दुर करण्यासाठी कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अंतिम टप्प्यात असणारे पाटबंधारे व सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करुन सदर कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) महाड तालुक्यातील १७ गावांना सिंचनासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या नागेश्वरी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणाचे काम ८०% पूर्ण झाले आहे व अंशत: पाणीसाठा निर्माण झाला आहे. योजनेच्या बुडीत क्षेत्रातील करंजाडी-बीजघर व मुमूर्शी नळ पाणीपुरवठा योजनांचे पुनर्स्थापनेचे काम आणि रेवतळे पूल व रस्ता पुनर्स्थापनेचे काम पूर्ण झाल्याशिवाय व प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता इत्यादी अभावी प्रकल्पाची कामे प्रलंबित आहे.

(२) राज्यात ३३४ प्रकल्प बांधकामाच्या विविध टप्प्यात आहेत. अंतिम टप्प्यातील प्रकल्पांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून पिण्याचे पाणी व सिंचन सुविधा पुरविण्याच्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

वनजमीन, पर्यावरण इत्यादी मान्यता मिळण्यास होणारा विलंब, भूसंपादन व पुनर्वसनास शेतकऱ्यांची सहमती मिळवण्यास लागणारा कालावधी, प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता आणि न्यायालयीन प्रकरणांमुळे होणारा विलंब इत्यादी कारणांमुळे प्रकल्पांच्या किंमतीमध्ये वाढ संभवते.

(३) नागेश्वरी धरणाचे काम ८०% पूर्ण झाले आहे. तथापि, सिंचन क्षमता निर्मितीच्या कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. प्रकल्पाची कामे कार्यान्वित ठेवण्याच्यादृष्टीने व्दितीय प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर उर्वरित कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) सद्य:स्थितीत राज्यात ६४ मोठे, ७९ मध्यम व १९१ लघु असे एकूण ३३४ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. मा.राज्यपाल महोदयांचे निदेश व राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार वार्षिक अर्थसंकल्पात प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात येते.

सदर बांधकामाधीन प्रकल्पांसाठी सन २०१८-१९ मध्ये रुपये ७४९२ कोटी एवढी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत राज्यातील २६ प्रकल्प समाविष्ट असून सदर प्रकल्पांसाठी केंद्राकडून अर्थसहाय्य प्राप्त होते. तसेच नाबार्डकडूनही प्रकल्पांना अर्थसहाय्य प्राप्त करून घेण्यात येत आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील तसेच उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण प्रकल्पांसाठी विशेष पॅकेजला केंद्राची मान्यता अंतिम टप्प्यात असून केंद्र सहाय्य प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न सुरू आहे.

राज्यातील अंतिम टप्प्यात असणारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील मुलांच्या पोषण आहाराची समस्या व इतर मागण्यांबाबत

(३६) * ४३५४६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात ग्राम बालविकास केंद्र पुर्ववत सुरू करण्यात यावी, तसेच बालकांना देण्यात येणारा पेस्टचा आहार बंद करून ताजे सकस अन्न व इतर तरतूदी पूर्वीप्रमाणे चालू ठेवून टिएचआर अंतर्गत मिळणारे अन्न पूर्णपणे बंद करुन मुलांना ताजा आहार मिळेल अशी व्यवस्था करावी व इतर विविध मागण्यांबाबतचे लेखी निवेदन माजी लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागण्यांप्रकरणी माजी लोकप्रतिनिधी व श्रमजीवी संघटनेच्या शिष्टमंडळासोबत मा.मुख्यमंत्र्यांबरोबर दिनांक १७ मार्च, २०१८ रोजी घेतलेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १७ मार्च, २०१८ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार अतितीव्र कुपोषित बालकांसाठी पालघर जिल्ह्यात २८५ ग्राम बालविकास केंद्र जून अखेर सुरु करण्यात येत असून त्याकरीता राज्यस्तरावरुन व जिल्हा नियोजन समितीकडून पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. यानुसार VCDC केंद्रामधून बालकांना पाकिटबंद आहार ऐजवी ARF (Amalyse Rich Food) हा स्थानिक स्तरावरुन देण्यात येणार आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्या हया खेड्यापाड्यावर तसेच दुर्गम भागात सुरु असून त्याठिकाणी ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना स्थानिक महिला मंडळ / बचत गटांमार्फत ताजा गरम आहार देण्यात येतो व केंद्र सरकारच्या गाईडलाईन प्रमाणे ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांसाठी घरपोच आहार पुरविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उजनी धरणातील पाणी नियोजनात भीमा नदीचा समावेश करण्याबाबत

(३७) * ४३७४७ प्रा.डॉ.तानाजी सावंत : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना उन्हाळी हंगामासाठी उजनी धरणातील पाणी भीमा नदीत सोडण्यासाठी सुधारित प्रकल्प आराखड्यात उजनी धरणापासून हिळळी बंधाऱ्यापर्यंतचा समावेश करणे या मागणीसाठी शेतकरी सिंचन भवनासमोर धरणे आंदोलन करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनी धरणाच्या पाणी नियोजनाच्या अभावामुळे भीमा काठच्या ३५ गावाचे शेतकरी त्यांच्या हक्काच्या पाण्यापासुन वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भीमा नदीकाठच्या ३५ गावातील शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे पाणी मिळण्यासंदर्भात कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) होय, अंशत: खरे आहे.

भीमा प्रकल्पाच्या उन्हाळी हंगाम सन २०१७-१८ च्या जाहीर प्रकटनामध्ये दुरूस्ती करुन भीमा नदी उजनी धरण ते हिळळी को.प. बंधाऱ्यापर्यंत प्रत्येक बंधाऱ्याच्या लाभक्षेत्राचा समावेश करण्याबाबत दिनांक ०५/०५/२०१८ रोजी लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर या कार्यालयासमोर पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही.

भीमा प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्पा अहवालामध्ये सिंचनासाठी उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्याची तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवजात अर्भकाची काळजी घेण्याबाबत जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीसोबत करार केल्याबाबत

(३८) * ४३७७९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नऊ जिल्ह्यांमध्ये अर्भक व माता मृत्य दर जास्त असल्याने अशा जिल्ह्यांमधील सुमारे ७० हजार परिचारिका यांना नवजात अर्भकाची काळजी कशी घ्यायची, तसेच गोल्डन मिनिटमध्ये त्यांना कसे उपचार द्यायचे याचे शिक्षण देण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागाने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सामंजस्य कराराचे स्वरुप काय आहे व त्याची राज्यात अंमलबजावणी केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. या करारानुसार राज्यामध्ये या संस्थेव्दारे पुढीलप्रमाणे सहाय्य करण्यात येणार आहे.

१) नर्स, आशा व आरोग्य सेविका यांचे प्रसुती, नवजात काळजी व शल्यक्रियागृह याबाबत कौशल्य विकास व क्षमता वाढविणे.

२) एम.डी.आर., टी.बी. याबाबत निदान, प्रशिक्षण व जनजागृती इ.

३) अर्श कार्यक्रमांतर्गत आंतर विभागीय समन्वय व बळकटीकरण, मोडयुल तयार करणे इ.

४) जंतुसंसर्ग प्रतिबंध या अंतर्गत जिल्हा रूग्णालय ठाणे व अलिबाग येथे पायलट स्टडी तयार करणे इ.

(२) प्रस्तुत सामंजस्य करारांतर्गत जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीव्दारे वरीलप्रमाणे सहाय्य करण्यात येणार असून राज्य शासन हे संबंधित प्रशिक्षणार्थीना कार्यमुक्त करणे, सनियंत्रण करणे, त्यांना प्रशिक्षण संस्था उपलब्ध करून देणे इ. व्यवस्था करणार आहे.

(३) सामंजस्य करार अंमलात आलेला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

पालघर जिल्हा परिषदेची परवानगी न घेता धोकादायक शाळा जमीनदोस्त केल्याबाबत

(३९) * **४१३०९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेची परवानगी न घेता धोकादायक झालेली शाळा शालेय समिती व डहाणु पंचायत समितीच्या संगनमताने मुख्याध्यापिकेने थेट जेसीबी लावून शाळा जमीनदोस्त केल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोकादायक झालेली शाळा पाडण्यासाठी जिल्हा परिषदेची परवानगी घेणे बंधनकारक असतानाही मुख्याध्यापिकेने नियम न पाळता थेट जेसीबी लावून शाळा जमीनदोस्त केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धोकादायक शाळेच्या नविन बांधकामासाठी पंचायत समितीने रुपये ४६ लाख मंजूर करुन कोणतीही निविदा न काढताच आपल्या मर्जीतील ठेकेदाराला काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, दिनांक ०९/०७/२०१७ रोजी अतिवृष्टी व वादळामुळे धोकादायक शाळेचा पश्चिमेकडील भाग कोसळला.

सदर कोसळलेला भाग नवीन बांधकाम करताना जेसीबीने हटविण्यात आला आहे.

सर्वशिक्षा अभियांनाच्या नवीन वर्गखोल्या बांधकाम मार्गदर्शक तत्वानुसार, शाळांचे बांधकाम ठेकेदार पध्दतीने न करता शाळा व्यवस्थापन समितीने स्वत: करावयाचे आहे. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीकडून निविदा काढण्यात आलेल्या नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(४०) * ४१४१७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २००७ पासून सुमारे २०,००० कर्मचारी अकरा महिन्यांच्या करार पद्धतीने कंत्राटी तत्वावर काम करत असून, राज्यातील NRHM चे २५०० कर्मचारी तसेच विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यासाठी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काम बंद आंदोलनातील कर्मचाऱ्यांच्या विरोधात सेवा समाप्त करण्याची कारवाई दिनांक १० मे, २०१८ च्या पत्रानुसार करण्याचे अभियान संचालक यांनी निर्देश दिले आहेत, त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याऐवजी शासन या कर्मचाऱ्यांच्या विरोधात सक्तीने सेवा समाप्त करीत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या १० वर्षापासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य सेवक अभियानात अनेक कंत्राटी कर्मचारी अल्पशा मानधनावर कार्यरत असताना डॉक्टर, फार्मासिस्ट, आरोग्य सेविका, डाटा एन्ट्री ऑपरेटर, आशा स्वयंसेविका इ. यांना समान काम समान वेतन मिळत नाही, तसेच, त्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेतले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील अधिकारी, कर्मचारी यांचे समिती स्थापनेपासून तीन महिन्यांच्या कालावधीत एनआरएचएम अंतर्गत सर्व कर्मचारी यांचे समायोजन करण्यात येईल असे आश्वासन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी दिले आहे, उक्त आश्वासन पूर्ण न झाल्याने नाशिक ते मुंबई लाँग मार्च काढून २४ मे, २०१८ ला आझाद मैदानात बेमुदत उपोषण करण्याचा इशारा ग्रामीण आरोग्य अभियान महासंघाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देऊन शासन सेवेत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत राज्यातील बरेचसे अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्या मागण्यांबाबत दिनांक ०८/०५/२०१८ पासून काम बंद आंदोलन सुरु केले होते. सदर काम बंद आंदोलन मागे घेण्यात आले असून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत संपावर गेलेले सर्व अधिकारी/ कर्मचारी दिनांक २१/०५/२०१८ पासून कामावर रुजू झाले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत राज्यातील बरेचसे अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्या मागण्यांबाबत दिनांक ०८/०५/२०१८ पासून काम बंद आंदोलन सुरु केले होते. सदर काम बंद आंदोलन मागे घेणार नसल्याचे अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, अधिकारी कर्मचारी महासंघाने दिनांक १०/०५/२०१८ रोजी लेखी कळविल्यामुळे दिनांक १०/०५/२०१८ रोजी या

पदांचे नियुक्ती प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) असल्याने त्यांनी काम बंद आंदोलनात सहभागी असलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना ४८ तासाच्या आत कामावर रुजू होणेबाबत कळवून सदर कर्मचारी कामावर हजर न झाल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, संघटनेने काम बंद आंदोलन मागे घेतल्यामुळे काम बंद आंदोलनात सहभागी झालेले सर्व कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना कामावर रुजू करुन घेणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियान हा केंद्र शासन पुरस्कृत कार्यक्रम असून केंद्र शासनाने प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात मंजूर केल्यानुसार अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी पदांना मानधन अदा करण्यात येते.

समान काम समान वेतनाबाबत केंद्र शासनाने दिनांक १३/०७/२०१७ च्या निर्देशानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या या नियमित कर्मचाऱ्यांपेक्षा भिन्न आहेत. सदर पदे अभियानांतर्गत निर्माण केलेली कंत्राटी पदे असून शासनाची नियमित पदे नाहीत.

(४) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी/कर्मचारी महासंघ यांनी दिनांक ०८/०५/२०१८ पासून काम बंद आंदोलन सुरु केले होते व संघटना नाशिक ते मुंबई लाँग मार्च काढणार होती. तथापि, दिनांक १८/०५/२०१८ रोजी मा.मंत्री (वित्त विभाग) व मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य विभाग) यांच्या सोबत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार संघटनेने दिनांक १९/०५/२०१८ रोजी काम बंद आंदोलन मागे घेतलेले आहे.

(५) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०८/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेमध्ये समायोजित करण्यासंदर्भात अभ्यास व शिफारस करण्यासाठी मा.मंत्री (वित्त विभाग), मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग) आणि मा.मंत्री (ग्रामविकास विभाग) या मान्यवरांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

जवळगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) मध्यम प्रकल्पाच्या कॅनॉलमधून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत

(४१) * ४१९७३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवळगाव मध्यम (ता.बार्शी, जि.सोलापूर) प्रकल्पाच्या कॅनॉलमधून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॅनॉलचे पाणी वाचविण्यासाठी सोलापूर जिल्हा रहिवासी संघटनेने कॅनॉलमधून वाया जाणारे पाणी त्वरीत थांबवावे त्यानंतरच पाणी सोडावे तसेच कॅनॉलची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) होय.

(२) असे निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त नाही.

(३) क्षेत्रियस्तरावरून पाहणी करण्यात आली असून दुरूस्ती कामाचे अंदाजपत्रकाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अष्टविनायक तिर्थक्षेत्र विकास आराखडा प्रलंबित असल्याबाबत

(४२) * ४२७९६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अष्टविनायक गणपतींपैकी पुणे जिल्ह्यात पाच गणपती देवस्थाने असल्याने जिल्हा प्रशासनाकडून "अष्टविनायक तिर्थक्षेत्र विकास आराखडा" शासनाला पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी व ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास ग्रामविकास व नगरविकास विभागाने करण्याबाबतच्या सूचना शासनाने दिल्या असून उक्त तिर्थक्षेत्रांचा विकास दोन विभागाकडे सोपविण्यात आल्यामुळे सदरहू अष्टविनायक तिर्थक्षेत्राचा विकास होत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अष्टविनायक तिर्थक्षेत्र विकास आराखडा पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, अंशतः खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील अष्टविनायक परिमंडळाचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास करणेबाबतचा आराखडा प्राप्त झाला आहे.

(२) व (३) पुणे जिल्ह्यातील पाचही अष्टविनायक तिर्थक्षेत्र हे ग्रामीण भागात आहेत. ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रास विहित अटींच्या अधीन राहून राज्यस्तरावरील राज्य निकष समितीमार्फत "ब" वर्ग दर्जा देऊन त्यास निधी ग्रामविकास विभागाकडून उपलब्ध करून दिला जातो. सबब, या तिर्थक्षेत्रास निधी मिळविण्यासाठी शासन निर्णय ग्रामविकास विभाग दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ मध्ये विहित अटींची पूर्तता करून प्रथम तिर्थक्षेत्राचा ब-वर्ग दर्जा प्राप्त असणे आवश्यक आहे.

पाच अष्टविनायक तिर्थक्षेत्रापैकी श्रीक्षेत्र मोरगांव, श्रीक्षेत्र थेऊर, श्रीक्षेत्र ओझर, श्रीक्षेत्र लेण्याद्री या चार तिर्थक्षेत्रांचा ब-वर्ग दर्जा मिळविण्यासाठीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले आहेत. सदर तीर्थ क्षेत्रांना ब-वर्ग दर्जा

देण्यासाठी प्राप्त झालेल्या चार प्रस्तावांपैकी श्रीक्षेत्र मोरगांव या तिर्थक्षेत्रास ५ जुलै, २०१४ रोजी "ब" वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा दिलेला आहे व श्रीक्षेत्र थेऊर, श्रीक्षेत्र ओझर या तिर्थक्षेत्रांचे प्रस्ताव ब-वर्ग दर्जा देण्यासाठी स्थापन केलेल्या राज्य निकष समितीच्या बैठकीत दिनांक ०७/०५/२०१८ रोजी ठेवण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून शकल्याने त्यांना ब-वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आलेला नाही. तसेच श्रीक्षेत्र लेण्याद्री या तिर्थक्षेत्राला ब-वर्ग दर्जा देण्याबाबताचा प्रस्ताव राज्य निकष समितीच्या बैठकीनंतर प्राप्त झाला आहे. सबब, श्रीक्षेत्र लेण्याद्रीचा प्राप्त ब-वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव पुढील राज्य निकष समितीच्या बैठकीत ठेवण्यात येईल.

तसेच श्रीक्षेत्र मोरगांव, या तिर्थक्षेत्राचा निधी उपलब्ध करून देणेबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विभागास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कामा रुग्णालयातील रेडिएशन मशीन बंद असल्याबाबत

(४३) * ४२०७० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कामा रुग्णालयातील कर्करोग रुग्णांसाठीच्या उपचाराकरीता असलेले रेडिएशन मशीन मागील नऊ महिन्यापासून बंद असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मशीन बंद असल्यामुळे या रुग्णालयात उपचारांकरीता येणाऱ्या रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मशीन खरेदीच्या वेळेस केलेल्या करारानुसार यंत्राची ९० टक्के रक्कम कंपनीला दिलेली असून उर्वरित १० टक्के रक्कम काही कालावधीनंतर देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मशीन ही वॉरंटी कालावधीमध्ये असून रुग्णालयाच्या निष्काळजीपणामुळे मशीन दुरुस्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कामा रुग्णालयातील रेडीएशन मशीन दुरुस्त करण्याबाबत किंवा नवीन खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर यंत्र बंद असल्याच्या कालावधीत उपचाराकरीता येणाऱ्या रुग्णांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील नायर रुग्णालयात तसेच टाटा मेमोरियल रुग्णालयात उपचारास्तव पाठविण्यात येत होते.

(३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

सदर यंत्रसामुग्री वॉरंटी कालावधीमध्ये आहे. यंत्रसामुग्री दुरुस्तीबाबत पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

(५) याविषयी संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. सदर यंत्रसामुग्री दिनांक २१/०५/२०१८ पासून कार्यान्वित झाली असून रुग्णसेवेत कार्यरत आहे.

राज्यात स्वयंसेवी संस्थांच्या बालगृहाचा प्रलंबित निधी वितरीत करण्याबाबत

(४४) * ४१७८२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : तारांकित

प्रश्न क्रमांक ३१४१४ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ९०० स्वयंसेवी संस्थांचे बालगृह कार्यरत असून त्यात ७० हजार मुला/मुलींना लाभ मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात महिला व बालविकास विभागाकडून सन २०११ ते २०१८ या कालावधीतील बालगृहाचे रुपये ७० कोटी अनुदान शासनाकडे प्रलंबित असून मा.उच्च न्यायालयाने निदेश देऊनही बालगृहाचे अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बालगृहांचे सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या २ वर्षाचे अनुदान थकीत असून याबाबत शासनाकडून मुल्यनिर्धारणाचे काम पूर्ण झाले असतानाही माहे मार्च, २०१८ अखेर बालगृहांना थकित अनुदान वितरीत करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून अनुदान वेळेत मिळत नसल्याने स्वंयसेवी संस्थांना आर्थिक अडचणी येत असून लाभार्थी मुलांची व्यवस्था करावी लागत आहे, तसेच, दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी परिपत्रक काढून संस्था चालकांची आर्थिक कोंडी केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बालगृहाचे प्रलंबित अनुदान वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

राज्यामध्ये ७४९ स्वंयसेवी बालगृहे व २५ शासकिय बालगृहे अशी एकुण ७७४ बालगृहे कार्यरत असून त्यामध्ये माहे मे, २०१८ अखेर १२८२३ एवढे बालके दाखल आहेत.

(२) व (३) सन २०१०-११ ते २०१४-२०१५ या कालावधीतील संस्थांचे अनुदान प्रलंबित आहे. शासन निर्णय दिनांक ०१/१०/२०१६ नुसार संस्थांना सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीतील दिलेल्या व देय अनुदानाचे पूनर्मूल्यनिर्धारण करण्यात आले. या पूनर्मूल्यनिर्धारणाकरीता संस्थांना बोलविण्यात आले होते. परंतु फक्त १७९ संस्थांनी पूनर्मूल्यनिर्धारणासाठी

त्यांचे अभिलेख तपासणीकरीता उपलब्ध करुन दिले. उर्वरित संस्थांनी अभिलेख उपलब्ध करुन न दिल्याने त्या दिनांक १/१०/२०१६ च्या शासन निर्णयानुसार अपात्र आहेत ज्या १७९ संस्थांनी अभिलेख उपलब्ध करुन दिलेले आहेत, त्यांची पूनर्मूल्यनिर्धारण अहवालानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या वर्षाचे मुल्यनिर्धारण आणि अंतिमीकरणाअंती देय होणारे अनुदान अदा करण्यात येत आहे. त्यापैकी ११.१९% प्रमाणे माहे मार्च, २०१८ अखेर अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जिल्हा परिषदांच्या लेखा अहवालाबाबत

(४५) * ४२९७१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विधिमंडळाच्या सन २०१८ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर झालेल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या लेख्यांवरील सन २०१५-१६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातून लेख्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर ६६९ कोटी ६८ लाख रुपयांच्या अनामत ठेव रक्कमांचे समायोजन झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लेख्यांचे समायोजन करण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे.

कंत्राटदाराचे/पुरवठादाराचे देयक अदा करताना सुरक्षा अनामत रकमेपोटी कराराप्रमाणे देयकातून रकमा वजा करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१४ प्रमाणे ठेव म्हणून ठेवण्यात येतात. कंत्राटदार/पुरवठादारांकडून रकमांची मागणी केल्यानंतर महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१७ नुसार जिल्हा परिषदेमार्फत संबंधित कंत्राटदार/पुरवठादारास विहित कालावधीनंतर परत करण्यात येतात.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २०९(७)(३), २१९ प्रमाणे तीन वर्षावरील ठेवी हया व्यपगत करुन महसूली जमा म्हणून घेण्यात येतात. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा/स्थायी समितीच्या मान्यतेनंतर व्यपगत ठेवीतील रकमा संबंधित कंत्राटदारास परत करण्यात येतात.

अनामत रकमा हया कंत्राटदाराने मागणी केल्यानुसार देय ठरत असल्यामुळे या रकमांचे समायोजन केले जात नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरात शासकीय व खाजगी रूग्णालयात रुग्णशय्या कमी असल्याबाबत

(४६) * ४२६३५ श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ३० लाख लोकसंख्या असलेल्या नागपूर शहरात डेंग्यू, स्वाइन फ्लू आदी सारखे मोठे आजार असताना शासकीय व खाजगी रूग्णालयात फक्त १२८१५ रुग्णशय्या असून २३४ रूग्णांमागे फक्त १ रुग्णशय्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात महानगरपालिकेचे ३७ रूग्णालय, १२ हेल्थ पोस्ट व १० माता बाल संगोपन केंद्र आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय आकडेवारीनुसार ५० हजार लोकसंख्या असलेल्या ठिकाणी एक हेल्थ पोस्ट असणे आवश्यक असून महानगरपालिकेचे फक्त १२ हेल्थ पोस्ट आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेची ३७ व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) नागपूर महानगरपालिकांतर्गत २६ (UPHC) अशी एकूण ६३ दवाखाने कार्यरत आहेत.

माता बाल संगोपन केंद्रे मंजूर नाहीत.

(३) शासन निर्णयानुसार ५० हजार लोकसंख्या असलेल्या ठिकाणी एक हेल्थ पोस्ट असणे अभिप्रेत आहे. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात तुर्तास २६ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांची खरेदी करण्याबाबत

(४७) * ४१३०४ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये १८ अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांची खरेदी करण्याकरीता जिल्हा नियोजन समिती निधीतून रक्कम उपलब्ध करुनही उक्त उपकरणांची खरेदी करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीकरीता कार्यवाही करावी असे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाने आदेश देऊनही उपकरणांची खरेदी न झाल्याने सदरहू रुग्णालयात प्राथमिक चाचण्या होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपकरण खरेदी प्रक्रियेस विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू उपकरणांची खरेदी कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे अंशत: खरे आहे.

सदर संस्थेसाठी १८ वैद्यकीय उपकरणांसाठी जिल्हा नियोजन समितीने उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या अनुषंगाने सदर यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी विभागाने दिनांक ०५/१०/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. यापैकी १६ यंत्रसामुग्रीची खरेदी प्रक्रिया हाफकिन महामंडळामार्फत सुरु आहे. उर्वरीत २ यंत्रसामुग्री संस्थेमार्फत खरेदी करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

प्रस्तावित यंत्रसामुग्री अद्यापी खरेदी झाली नसली, तरी सध्या संस्थेत उपलब्ध असलेल्या यंत्राद्वारे रुग्णांच्या चाचण्या करण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सदरहू उपकरणांची निविदा प्रक्रिया प्रगतीत असून निविदा प्रक्रियेअंती यंत्रसामुग्री खरेदी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येईल.

पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील समस्यांवर उपाययोजना करण्याबाबत

(४८) * ४१५७१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८०७ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर हे प्रसिद्ध तिर्थक्षेत्र असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाची क्षमता वाढवून २०० रुग्णशय्या करण्यात आली असून सदर क्षमतेनुसार आवश्यक असणारे मनुष्यबळ व वैद्यकीय सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या भाविकांची गैरसोय दूर करण्यासाठी तेथे मनुष्यबळ व वैद्यकीय सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयाचे बांधकाम २०० खाटांचे नसल्यामुळे त्याप्रमाणात मनुष्यबळ दिलेले नाही, तथापि उपलब्ध मनुष्यबळात आवश्यक वैद्यकिय सुविधा दिल्या जातात.

(३) पंढरपूर, जि.सोलापूर येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास बृहत आराखड्यामध्ये मान्यता दिलेली आहे.

तद्नंतर उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांना बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडा सादर करण्याबाबत कळविले असून त्यांच्याकडून इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे अद्याप अप्राप्त आहेत. याबाबत

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त करुन घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सद्य:स्थितीत पंढरपूर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून रुग्णांना अत्यावश्यक सेवा सुविधा पुरविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा देण्याबाबत

(४९) * ४१७७३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या कालवा क्र. १ व कालवा क्र. २ साठी शासनाने ३०० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या असून उक्त शेतकऱ्यांना जमीन संपादनाचा फक्त २५ टक्के मावेजा दिला असून उर्वरीत मावेजा न मिळाल्याने शेतकरी उर्वरित मावेजा देण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना कालवा क्र. १ व कालवा क्र. २ साठी ३०१ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची कार्यवाही सरळ खरेदीने सुरू असून २५% शेतकऱ्यांना मावेजा देण्यात आला ही बाब खरी नसून काही शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार व त्यांची निकड लक्षात घेऊन निधी उपलब्धतेनुसार काही प्रमाणात अग्रिम देण्यात आले आहे. उर्वरीत मावेजा देण्याबाबत निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या कालवा क्र. १ व कालवा क्र. २ साठी संयुक्त मोजणीनुसार ३०१ शेतकऱ्यांची जमिनीची मोजणी करण्यात आलेली असून काही शेतकऱ्यांना अग्रिम मावेजा दिलेला आहे. जमिनीचे सरळ खरेदीने भूसंपादन प्रस्तावित आहे.

जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेंतर्गत असलेल्या जिल्हास्तरीय समितीने सदर प्रकरणात सरळ खरेदीने भूसंपादन करण्यापूर्वी दिलेल्या १३ अटींचे पालन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने सर्व बाबींची सक्षम स्तरावरून तपासणी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

संपादित जमिनीचा मावेजा शेतकऱ्यांना देण्यासाठी एकूण रक्कम रुपये २३.०९ कोटी निधी उपलब्ध असून त्यापैकी रुपये ५.७१ कोटी संबंधितांना अदा करण्यात आला आहे. उर्वरित रक्कम रुपये १७.३८ कोटी रजिस्ट्रेशनची कार्यवाही पूर्ण करून जमिनधारकांना मावेजा वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

महसूल व वन विभागाच्या, शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१७ मधील निर्देशानुसार सरळ खरेदीसाठी न्यायालयीन विवाद नसल्याची व खरेदी प्रक्रियेसाठी कोणतीही बाधा येत नसल्याची खात्री करण्यासाठी ९८ जमिनधारकांचे कागदपत्रे महसूल विभागास सादर करण्यात आलेले असून त्यानंतर रजिस्ट्रेशनची कार्यवाही व मावेजा वाटपाची कार्यवाही करण्याचे काम प्रगतीत आहे.

कुर्झे (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये विकास कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(५०) * **४१८९६ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्झे (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये गवळीपाडा या पाड्यातील जुनी विहीर दुरुस्ती करण्यासाठी सन २०१५-१६ वर्षासाठी चौदाव्या वित्त आयोग निधीतून रुपये ७२.३८५ मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहीर दुरुस्त न करताच संपूर्ण रकमेचा अपहार झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावामध्ये तरुण नोकरीपासून वंचित असल्याबाबत

(५१) * ४३०७४ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावामध्ये विद्युत समस्यांचे निरासन व्हावे या उद्देशाने ग्रामविद्युत व्यवस्थापक नियुक्ती करण्याचा आदेश शासनाने देऊनही या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने बेरोजगार तरुण नोकरीपासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागभीड तालुक्यात ही प्रक्रिया माहे जानेवारी ते मार्च, २०१७ मध्ये राबविण्यात आली असून ग्रामसभेने वीज वितरण कंपनीकडे निवड केलेल्या उमेदवारांची शिफारस करुनही त्यांच्या नियुक्तीचे आदेश दिले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

नागभिड पंचायत समिती, जिल्हा चंद्रपूर अंतर्गत ५६ ग्रामपंचायती असून ग्रामपंचायतस्तरावर प्राप्त अर्जानुसार ३००० लोकसंख्येच्या आतील एकूण ५१ ग्रामपंचायतीला विद्युत व्यवस्थापक नेमणूक करावयाचे आहेत. त्यापैकी ५० ग्रामपंचायतींनी विद्युत व्यवस्थापक नेमणूक करण्याची शिफारस महावितरण कंपनीकडे केलेली आहे. एका ग्रामपंचायतीस निकषानुसार पात्र उमेदवार उपलब्ध झालेला नाही. शासन निर्णय क्र.व्हीपीएम २०१६/प्र.क्र.८/ पंरा ३ दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ मधील निवड प्रक्रियेशी संबंधित तरतुदीनुसार ग्रामपंचायतीकडून महावितरण कंपनीकडे शिफारस केलेल्या उमेदवारांना महावितरण कंपनीकडून पात्रतेसंबधीचे प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्याने त्यांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले नाहीत. महावितरण कंपनीकडून सदर उमेदवारांच्या निवड प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कौशल्य विकास प्रशिक्षण प्रक्रिया सुरु असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यावर महावितरण कंपनीकडून पात्र उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात येईल व त्यांची नियुक्ती संबधीत ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येईल.

चिमूर, सिंदेवाही, मूल (जि.चंद्रपूर) येथील परिसरात वाघ व बिबटयाने शेतकऱ्यांवर केलेल्या हल्ल्याबाबत

(५२) * ४२५१६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात चिमूर, सिंदेवाही, मूल परिसरात मोठ्या प्रमाणात वाघ व बिबटयाने धूमाकूळ घातला असून तीन शेतकऱ्यांना जखमी केल्याची घटना दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाघाचा बंदोबस्त करण्यासंबधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) व (२) ब्रम्हपूरी वन विभागातील चिमूर क्षेत्रात दिनांक १६/०५/२०१८ रोजी श्री.सत्यपाल वासुदेव ढोणे, रा.सोनेगाव व दिनांक २४/०५/२०१८ रोजी श्री.अभिमन कवडू शंभरकर, रा.कवडशी बिबटयाच्या हल्ल्यात जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर दोन्ही प्रकरणात प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुज्ञेय आर्थिक मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

ब्रम्हपूरी वन विभागात चिमूर परिक्षेत्रात तसेच सिंदेवाही परिक्षेत्रात सातत्याने मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना घडत असल्याने सदर परिसरात अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत गस्त करण्यात येते. सदर परिसरात कॅमेरा ट्रॅप लावून वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचा मागोवा घेतला जात असून वन्यप्राण्यांपासून बचाव करण्याकरीता गावागावात जनजागृती करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिमोफिलियाच्या रूग्णाला औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत

(५३) * ४२७०१ श्री.प्रसाद लाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील वर्षभरापासून हिमोफिलियाच्या रूग्णाला अत्यावश्यक असलेली फॅक्टर आठ, नऊ, सात व थिबासाठीची इंजेक्शन व औषधे उपलब्ध नसल्यामुळे रूग्ण त्रस्त असून हिमोफिलिया सोसायटी ऑफ इंडियाचे सचिव श्री.अजय पालांडे यांनी मागील १ वर्षापासून मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक

आरोग्य मंत्री, संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन आदींना लेखी निवेदनाद्वारे रूग्णांसाठी आवश्यक असलेली औषधे उपलब्ध करून देण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाफकिन इन्स्टिट्युटकडे खरेदी प्रक्रिया सोपविली असल्यामुळे व निविदेतील तांत्रिक अडचणींमुळे औषधांची खरेदी प्रलंबित असून औषधाच्या तुटवड्यामुळे राज्यातील ४२५६ रूग्णांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिमोफिलिया रुग्णांना सदरहू औषधे खरेदी करुन मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.अजय पालांडे यांची हिमोफिलीया रुग्णांसाठी आवश्यक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि हिमोफिलीयावरील औषधे उपलब्ध नाहीत, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हिमोफिलियाग्रस्त रुग्णांना तातडीने औषध पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी आणीबाणी तत्वावर आवश्यक औषधसाठा केंद्र शासनाच्या ESIC च्या दरकरारानूसार खरेदी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील ग्रामीण भागात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याबाबत

(५४) * ४३७२१ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात भटक्या कुत्र्यांची दशहत वाढत असून आतापर्यंत ३५ हजार ४९९ नागरीकांना कुत्रे चावले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रोज ४ ते ५ रुग्ण कुत्रा चावल्यामुळे उपचारासाठी येत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भटक्या कुत्र्यांचा वावर रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अहमदनगर जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीत ४०२८८ श्वानदंश रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचार देण्यात आले आहे हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रात माहे एप्रिल, २०१८ च्या श्वानदंश रुग्णांच्या आकडेवारीवरुन सरासरी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात रोज १ ते २ रुग्ण उपचारासाठी येत असल्याचे आढळून आले आहे.

(३) शासन निर्णय, दिनांक २०/०१/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनानुसार अहमदनगर जिल्हा परिषद प्रशासनाने कुत्र्यांमुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या समस्यांकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांची देखरेख समिती स्थापन केलेली आहे. सदर समितीमार्फत भटके कुत्रे पकडणे, वाहतूक करणे, निर्बिजिकरण करणे, लसीकरण करणे, औषधोपचार करणे, पिसाळलेले/गंभीररित्या आजारी असलेल्या कुत्र्यांना वेदनाविरहीत मृत्यू देणे, जनजागृती करणे, पाळीव कुत्र्यांच्या मालकांसाठी व व्यावसायिक पशुपैदासकांसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे, भटक्या कुत्र्यांची गणना करणे, कुत्रा चावलेल्या रुग्णांवर देखरेख करणे इ. बाबत सूचना निर्गमित करणे व उपाययोजना करण्याची कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील कृषी खात्यातील पाणलोट व मृदसंधारण विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत

(५५) * ४२८०६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कृषी विभागातील पाणलोट व मृदसंधारण विभागातील कामांमध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याची तक्रार कृषी पर्यवेक्षकाने कृषी आयुक्त, सच्चिंद्र प्रतापसिंह यांच्याकडे माहे मे, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात कृषी आयुक्तालयातील अधिकारी विनायक देशमुख यांच्यासमोर केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२) या संदर्भात दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये आयुक्त, कृषी यांनी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून समितीच्या अहवालानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्रीय पंचायत राज समितीच्या धोरणानुसार राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये ग्रामस्वराज्य अभियान राबविण्याबाबत

(५६) * ४२२४० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय पंचायत राज समितीच्या धोरणानुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील २३ जिल्ह्यातील १९२ गावांमधील ग्रामपंचायतीमध्ये दिनांक ५ मे, २०१८ रोजीपर्यंत ग्रामस्वराज्य अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व ही योजना कोणकोणत्या जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणार आहे तसेच या अभियानासाठी निवडलेले २३ जिल्हे व १९२ गावांची निवड कोणत्या निकषावर करण्यात आली आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाचे पंचायत राज मंत्रालयामार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ग्रामस्वराज अभियान दिनांक १४/०४/२०१८ ते दिनांक ०५/०५/२०१८ या कालावधीत राबविण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राज्यातील २३ जिल्ह्यातील १९२ गावांमध्ये "सबका साथ सबका गाव सबका विकास" अशी एक विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

(२) सामाजिक सलोखा वा अभिसरण वृध्दींगत करणे, ग्रामीण भागातील गरींबापर्यंत पोहचणे, सद्य:स्थितीत कार्यरत योजनांबाबत माहिती घेणे, नवीन उपक्रमांमध्ये समावेश करुन घेणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, स्वच्छता सारख्या राष्ट्रीयस्तरावरील कार्यक्रमांना पुढे घेऊन जाणे व पंचायत राज

संस्थांचे बळकटीकरण करणे ही ग्रामस्वराज अभियानाची प्रमुख उद्दीष्टे साध्य करण्यासाठी दिनांक १४/०४/२०१८ ते दिनांक ५/०५/२०१८ या कालावधीत ग्रामस्वराज अभियान राबविण्यात आले.

या अभियान कालावधीमध्ये देशातील जास्तीत जास्त गरीब कुटुंबे असलेल्या एकूण २१०५८ गावांची निवड करण्यात आली असून "सबका साथ सबका गाव सबका विकास" या विशेष मोहिमेद्वारे प्रधानमंत्री उजाला योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री सहज बिजली योजना हर घर योजना (सौभाग्य), प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती बीमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना व मिशन इंद्रधनुष्य या सात योजना सर्व गावांमध्ये राबवून त्या ठिकाणी या अभियानाचे १००% साध्य पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले होते.

यानुसार महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गरीब कुटुंबे असलेल्या २३ जिल्ह्यातील १९२ गावांची निवड केंद्र शासनाकडून करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोंढर ते चिवेली बंदर (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याच्या कामाबाबत

(५७) * ४३१५० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७६३ ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात

सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंढर ते चिवेली बंदर (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या ११ कि.मी लांबीच्या रस्त्याचे काम मा.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत घेण्यात आले असून सदर रस्त्याच्या कामासाठी रुपये ६ कोटी ६४ लक्ष तसेच दुरुस्तीच्या कामासाठी रुपये ५१ लक्ष मान्यता देण्यात आली असून या कामाची निविदा काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाची निविदा काढण्यात आली नसल्याचे दिनांक २१ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या काळात या कामाची निविदा केव्हा व किती रकमेची मागविण्यात आली त्यानुसार एकूण किती निविदा प्राप्त झाल्या व कोणती निविदा अंतिम करण्यात आली आहे त्याचप्रमाणे याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चुकीची माहिती देणाऱ्या संबधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

या कामाची रुपये ४६०.१२ लक्ष रक्कमेची ई-निविदा दिनांक १२/०३/२०१८ रोजी मागविण्यात आली असून ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १९/०४/२०१८ होता.

सदर कामासाठी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त ३ निविदांपैकी सर्व निविदा आवश्यक कागदपत्र न जोडल्याने छाननी समितीमार्फत अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. कोकण विभागातील विधानपरिषद पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता संपताच सदर कामासाठी निविदेची दुसरी मागणी प्रसिद्ध करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची आचारसंहिता दिनांक २०/४/२०१८ ते दिनांक २९/५/२०१८ व विधानपरिषद पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता दिनांक २४/५/२०१८ ते दिनांक २९/५/२०१८ पर्यंत असल्याने सदर निविदेची दुसरी मागणी प्रसिध्द करता आली नाही.

जिल्हा शल्यचिकित्सकांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून परस्पर निविदा काढून औषध खरेदी केल्याबाबत

(५८) * ४२८१५ श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही विभागाला औषधांची गरज लागल्यास त्यांनी ती मागणी आपल्या विभागाकडे नोंदवून ती विभागाने एकत्र करून महामंडळाकडे नोंदवावी त्यानंतर हाफकिन महामंडळाने पुढील प्रक्रिया करून संबंधित विभागांना औषधे उपलब्ध करून द्यावीत असा शासनाचा आदेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशाचे उल्लंघन करून अमरावतीच्या जिल्हा शल्यचिकीत्सकांनी स्वत:च्या अधिकारात दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी बीड जिल्हा शल्यचिकीत्सकांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी तसेच वर्धा जिल्हा शल्यचिकीत्सकांनी दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी परस्पर स्वतंत्र निविदा काढून औषध खरेदी केल्याचा प्रकार निदर्शनास आला असून, याबाबत प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे माहे मार्च, २०१८ मध्ये लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा शल्यचिकीत्सक, अमरावती, सामान्य रुग्णालय, वर्धा तसेच बीड यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत तातडीच्या खरेदीसाठी सदर प्रक्रिया राबविली. तथापि हाफकिन महामंडळाकडून लवकरच औषध पुरवठा होणार असल्याचे समजल्याने सदर खरेदीची प्रक्रिया रद्द करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वडझरी (ता.पाटोदा, जि.बीड) येथील ग्रामपंचायतीची मग्रारोहयोची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

(५९) * ४२६२० श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडझरी (ता.पाटोदा, जि.बीड) येथे सन २०१३ ते २०१८ या कालावधीत ग्रामपंचायतीने मग्रारोहयोची ३० कोटी रुपयांची कामे निकृष्ट असल्याची तक्रार ग्रामस्थांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मग्रारोहयो अंतर्गत ३० कोटी रुपयांची कामे गावात झाली नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत वडझरी अंतर्गत हनुमानवाडी ते म्हाळपाची वाडी-करंजवण फाटा रस्ता मजबुतीकरणात रुपये २ कोटी मिळाले आहेत, परंतु प्रत्यक्षात काम झालेच नाही, गावांतर्गत रस्ते, जलसंधारणाची कामे, वृक्षारोपण असे अनेक कामे केवळ कागदपत्रावरच आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामध्ये मग्रारोहयो अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, वन अधिकारी व जलसंधारणाचे अभियंता यांनी सरपंच व पदाधिकारी यांच्या सोबत आर्थिक संगनमत करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी दिनांक २२/०६/२०१८ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. चौकशी अहवालात दोषी आढळल्यास संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यात येईल.

कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्या मोडकळीस आल्याबाबत

(६०) * ४२४०८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ५७९ शाळांमधील १ हजार २२६ वर्ग खोल्या मोडकळीस आल्या असून या शाळातील सुमारे ५० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांच्या जिवीताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधीची तरतूद करुन मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ५७९ शाळांमध्ये १२२६ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. तसेच नविन ३२२ वर्गखोल्या बांधकाम करणे गरजेचे आहे. याबाबत निधी मंजूरीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे केलेली आहे. त्यानुषंगाने जिल्हा नियोजन समितीने खालीलप्रमाणे नियतव्यय मंजूर केलेला आहे :-

वर्ष	कामांचा तपशिल	मंजूर नियतव्यय
२०१७-१८	५२ शाळांची दुरुस्ती	रुपये ७५.०० लक्ष
	२२ नविन वर्ग खोल्यांचे बांधकाम	रुपये १२०.३६ लक्ष
२०१८-१९	२७४ शाळांच्या दुरुस्तीची कामे	रुपये ३५०.०१ लक्ष
	७० नविन वर्ग खोल्यांची बांधकामे	रुपये ४२६.०९ लक्ष

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यात अनेक भागात मग्रारोहयोची कामे बंद असल्याबाबत

(६१) * ४१२६६ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात अनेक भागात मग्रारोहयोची कामे बंद असल्यामुळे मजुरांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक मजुरांना काम नसल्यामुळे ते स्थलांतर होत आहेत, जिल्ह्यात दुष्काळाची स्थिती असताना, जिल्ह्यातील अनेक भागात मग्रारोहयोची कामे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने त्वरित मग्रारोहयोची कामे सुरू करण्याबाबत व मजुरांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात यवतमाळ जिल्ह्यात एकुण ३५६५१ कामे सुरु आहेत व या वर्षात ९.९३ लक्ष मनुष्य दिन निर्मिती झाली आहे. मनरेगा योजनेत मजुरांच्या मागणीप्रमाणे त्यांना काम उपलब्ध करुन दिले जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कंधार, मुखेड, भोकर (जि.नांदेड) या तालुक्यातील माळरानावर उत्पन्न झालेली वृक्षसंपदा आगीत भस्मसात झाल्याबाबत

(६२) * ४२१३९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कंधार, मुखेड, भोकर हे तालुके डोंगराळ भागात असून या डोंगरावरील माळरानावर वन विभागामार्फत व नैसर्गिकरित्या वणवा लागून उत्पन्न झालेली वृक्षसंपदा आगीत भस्मसात होत असून वन विभागातील अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नैसर्गिक वनसंपदेची होणारी हानी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड वन विभागांतर्गत मुखेड व भोकर वनपरिक्षेत्रामध्ये आगीच्या एकूण ३० घटना घडलेल्या असून त्यामध्ये ४०.५० हे. क्षेत्र जळीत झाले आहे.

तथापि, जंगलाला लागलेल्या आगीत फक्त पालापाचोळा व गवत जळाले असून उत्पन्न झालेली वृक्षसंपदा आगीत भस्मसात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदर प्रकरणात अधिकारी व कर्मचारी यांनी प्रसंगावधान दाखवून वेळीच आग विझविण्याची कार्यवाही केलेली आहे. सदरील आगीच्या प्रकरणात अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष केलेले नाही

(२) सदर आगीच्या प्रकरणात भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. (Fire Watchers) आग लागू नये याकरीता या विभागात नियतक्षेत्र अग्निरक्षक ठेवण्यात आले आहेत. अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्राची नियमित गस्त केली जाते. जाळ रेषा घेण्यात येतात. संयुक्त वनव्यवस्थापन समिती यांची वनसंरक्षण कामी मदत घेण्यात येते.

(३) हे खरे नाही.

कर्जत (जि.रायगड) उपजिल्हा रुग्णालयाची तसेच परिसरातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थान देखभालीबाबत

(६३) * ४३५५७ श्री.परिणय फुके : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) उपजिल्हा रुग्णालयाची तसेच परिसरातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानांची योग्य देखभाल न केल्याने पडझड झाली असून सांडपाणी वाहून नेणारी ड्रेनेज सिस्टीम नादुरुस्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिंतीवरुन जमिनीच्या दिशेने येणारे सांडपाण्याचे पाईप जागोजागी फुटल्याने त्यातून मैला व सांडपाण्याची गळती सुरु असून मैलायुक्त सांडपाणी परिसरात पसरल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच दलदलीवर डासांची मोठ्या प्रमाणात उत्पत्ती होऊन रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी रुग्णालय प्रशासनाकडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत यांच्याकडे तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कर्जत उपजिल्हा रूग्णालयाच्या इमारतीची दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहेत. रुग्णालय परिसरातील निवासस्थानांची ड्रेनेज सिस्टीम दुरुस्तीची कामे पुर्ण झाली असून सांडपाणी वाहून नेणारी ड्रेनेज सिस्टीम सुस्थितीत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) रूग्णालय प्रशासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीची प्रत प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नाही. तथापि, सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधून उपजिल्हा रूग्णालय कर्जत, जि.रायगड येथील कामांना निधी उपलब्ध झाला असून कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

(६४) * **४३०७६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील महत्वाकांक्षी जिगाव प्रकल्प मागील २१ वर्षापासून प्रलंबित असून सदरहू जिगाव प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे या प्रकल्पाची किंमत २७ पटींनी वाढून प्रकल्प १० हजार ६४२ कोटींवर पोहोचला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्प प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरीता सुमारे आठ हजार कोटींची गरज असून सदरहू प्रकल्प निधीअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरीता आठ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) खरे आहे.
(२) प्रकल्पग्रस्तांच्या तिव्र विरोधामुळे बुडीत क्षेत्राचे भुसंपादनास व पुनर्वसनास झालेला विलंब व वनजमिनीचे प्रस्तावास सन २००८ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्पाचे कामास सुरुवात करणे शक्य झाले आहे. दरसुची २०१६-१७ नुसार प्रकल्पाची अद्ययावत किंमत १२६६२.१७ कोटी इतकी केंद्रीय जल आयोगाकडे प्रस्तावित असून प्रकल्पावर मार्च, २०१८ पर्यंत

रुपये ३०७७.१२ कोटी खर्च झाला आहे व उर्वरीत प्रकल्पाचे कामासाठी रुपये ९५८५.०५ कोटी निधीची आवश्यकता आहे. प्रकल्पासाठी निधी कमी पडत असून त्यामुळे भूसंपादन, पुनर्वसनाच्या कामामध्ये प्रगती होत नाही.

(३) जिगाव प्रकल्पास सन २०१८-१९ ची तरतुद ३४३.३४ कोटी असून जिगाव प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरीता आजपावेतो रुपये ३०७७.१२ कोटी निधी खर्च करण्यात आला आहे. प्रकल्पास सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमांतर्गत नियमित रुपये ३०० ते ५०० कोटी निधीची तरतुद गेल्या ३ वर्षापासुन होत आहे.

(४) प्रकल्पाचे काम मार्गी लावणेसाठी जिगाव प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या बळीराजा संजीवनी योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आलेला असून केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे निधी प्राप्त होणार आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पैसे मिळण्याबाबत

(६५) * ४३४६० श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात ५ हजार हेक्टरवर फळबाग लागवड करण्यात आली असून त्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून प्रस्ताव पाठविण्यात येवून देखील सदरहू रोपांच्या खरेदीसाठी आलेल्या ४ कोटी रुपयांच्या खर्चाचे पैसे लाभार्थ्यांना मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थी शेतकऱ्यांना पैसे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रोपांच्या खरेदीसाठी आवश्यक असणाऱ्या एकूण रुपये ३,७५,४०,७५२/- इतक्या रकमेपैकी रुपये २,९१,४६,४०७/- इतकी रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्यात आली आहे. उर्वरित रुपये ८३,९४,३४५/- इतकी रक्कम देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

महिला व बालकांच्या कल्याणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(६६) * ४३५१६ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी कमी तरतूद करण्यात येत असून त्या योजनांच्या प्रसिद्धीसाठी अठरा कोटी रुपयांच्या निधीची व्यवस्था करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांसाठी राज्याच्या सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात सुमारे तीनशे ते सव्वा तीनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याने त्यात ३०% कपात म्हणजे त्यातून रुपये ९० ते १०० कोटी कमी झाल्याने अनेक योजनांची अंमलबजावणी होणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महिला व बालकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी अधिक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) नाही.

महिला व बालविकास विभागाच्या योजनांसाठी मागील तीन वर्षांच्या सरासरी खर्चाचा तसेच योजनांसाठी आवश्यक निधीचा विचार करून निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

महिला व बालविकास विभागाच्या सर्व योजनांच्या प्रसिध्दीसाठी पंधरा कोटी रूपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

सन २०१८-१९ च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१८ अखेर) अर्थसंकल्पित तरतूदीच्या ७० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सदर निधी खर्च झाल्यावर आवश्यकतेनुसार उर्वरित ३०% निधी उपलब्ध करून देता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यात एड्स नियंत्रण कार्यक्रम राबविण्याबाबत

(६७) * ४३१९० श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात केलेल्या आरोग्य यंत्रणेच्या तपासणीत ४६१ जणांना एड्सची लागण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून जिल्ह्यात औद्योगिक वसाहती असल्याने रोजगाराच्या निमित्ताने परप्रांतियांतून येणाऱ्या लोंढयांमुळे एड्सची लागण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने एड्स लागण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.दीपक सावंत : (१) रायगड जिल्ह्यात सन २०१७-१८ या कालावधीत ४६१ एडस बाधित रूग्ण आढळून आले आहेत.

(२) रायगड जिल्ह्यामध्ये एड्स नियंत्रण कार्यक्रमाच्या अनुषंगाने दरमहा बैठक घेतली जाते यामध्ये सामान्य व्यक्ती तसेच गरोदर महिला यांच्या तपासण्या, त्यात आढळून आलेले एच.आय.व्ही. बाधित रूग्ण, त्यांचे उपचार, मृत्यू इ. बाबींचा नियमितपणे आढावा घेतला जातो. तसेच या मुद्दयांच्या अनुषंगाने राज्यस्तरावरही सर्व जिल्हयांचा नियमितपणे आढावा घेतला जातो.

सर्व संसर्गित व्यक्तींना राज्यातील ७३ ए.आर.टी.केंद्राच्या माध्यमातून मोफत समुपदेशन, औषधोपचार, सीडी ४ रक्त चाचणी व संधीसाधु आजारावर औषधांची सेवा देण्यात येते. ए.आर.टी. केंद्रामार्फत शासनाच्या “Treat all Policy” अंतर्गत सर्व एचआयव्ही संसर्गित रूग्णांना एस.आर.व्ही औषधे दिले जाते. यामुळे संधीसाधु आजारामुळे होणारे संसर्ग कमी होतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बीड ग्रामीण ग्रामपंचायत कागदावर दाखवुन लाखो रुपयांचा अपहार केल्याबाबत

(६८) * ४१४२० श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात बीड ग्रामीण १ व २ अशी खोटी व अस्तित्वात नसलेली ग्रामपंचायत कागदोपत्री दाखवून लाखोंचा आर्थिक अपहार सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला असल्याचा प्रकार दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड तालुक्यातील मैंदा ते बीड या रस्त्यावर वृक्ष संगोपन प्रत्यक्ष न करता ते केल्याचे भासवून बोगस मजुरांच्या नावे लाखो रुपयांच्या गैरव्यवहार झाल्याचे तसेच नरेगाच्या वेबसाईटवर बोगस ग्रामपंचायत स्थापन करून बोगस कामे केल्याचे स्पष्ट दिसत असतांनाही संबंधितांविरोधात कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या आर्थिक अपहार व फसवणुकीबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) व (२) बीड जिल्ह्याच्या नरेगा संकेतस्थळावर बीड ग्रामीण-१ व २ अशी स्थळे उपलब्ध करुन दिलेली आहेत. मौजे बीड ते मैंदा रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड कामे ही बीड शहरापासून सुरु होत असल्याने सदर कामाची नोंद बीड ग्रामीण १ व २ मध्ये करुन कामे सुरु केलेली आहेत.

वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने, सदर कामाची सखोल चौकशी करण्यात आलेली असून अंदाजपत्रकाप्रमाणे दैनंदिन मजूरी बँकेमार्फत अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कामामध्ये आर्थिक अपहार झालेला नाही.

(३) चौकशीमध्ये वृक्ष लागवड संगोपन कामामध्ये कुशल कामाचे मागणीचे अनुदान मागवून १८ महिन्यांची उंच रोपे लागवड करण्याऐवजी ३ ते ४ महिन्यांची रोपे लागवड करुन उद्दिष्टानुसार काम न करणे, स्थानिक मजुरांना कामे उपलब्ध करुन न देणे, स्थानिक ग्राम रोजगार सेवकाची हजेरी पत्रकावर सहया न घेणे, वरिष्ठ कार्यालयास कामाचा अहवाल न पाठविणे, तांत्रिकदृष्टया अंदाजपत्रकाप्रमाणे कामे न करणे, कामामध्ये हेतूपुरस्सरपणे दुर्लक्ष करणे, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय छाननी समितीच्या मंजूरीविना कामे चालू करणे, शासकीय कामात निष्काळजीपणा इ. तांत्रिक व प्रशासकीय अनियमितता झाल्याचे दिसून आले आहे. याबाबत तत्कालिन वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनमजूर यांच्यावर मग्रारोहयो कायदयानुसार शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) येथील रस्त्यावरील अतिक्रमण दूर करण्याबाबत

(६९) * ४२६६१ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०८०४ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गट नं. २१ या रस्त्यावर श्री.बबन चुरी यांनी अतिक्रमण केल्याचे सिध्द झाल्याने त्यांच्याविरुध्द सरपंच व ग्रामसेवक यांना अतिक्रमण काढण्याच्या नोटीस पाठविण्यात येऊनही सदर अतिक्रमण हटविण्यात न आल्याने संबंधितांविरुध्द शासकिय कामात अडथळा आणल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रस्त्याचे काम किती कालावधीपर्यंत सुरु करण्यात येईल,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९ (१) अन्वये तत्कालिन ग्रामसेवक व विद्यमान ग्रामसेवक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) अतिक्रमण दुर करण्यासाठी भुमि अभिलेख, डहाणू यांनी दिनांक १४/०३/२०१८ रोजी जागेची मोजणी करुन हद्द निश्चित केली त्यानुसार अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे. हे अतिक्रमण विशेष मासिक सभेचे आयोजन करुन चर्चा करुन दिनांक ०८/०६/२०१८ रोजी पोलीस संरक्षणात काढण्याचे ठरविण्यात आले. अतिक्रमण काढण्यासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित राहीले. परंतु, पोलीस संरक्षण उपलब्ध न झाल्याने, सदर दिवशी अतिक्रमण काढण्यात आले नाही. पोलीस संरक्षण प्राप्त झाल्यानंतर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येईल. सदर अतिक्रमण हटविल्यानंतर ग्रामसभेची मान्यता घेऊन निधी उपलब्ध झाल्यानंतर सदर रस्त्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत सुरु करण्यात येईल.

(३) याप्रकरणी चौकशी केली असून तत्कालिन व विद्यमान ग्रामसेवक यांची महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील कलम ४(२) अन्वये पुढील एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता थांबविण्यात आली आहे व विद्यमान सरपंच, ग्रामपंचायत बावडा यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ३९(१) अन्वये कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली असून पुढील कार्यवाही विभागीय आयुक्तांकडे लवकरात लवकर सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खर्डी (जि.ठाणे) येथील घरकुलांची कामे सुरू करण्याबाबत

(७०) * ४३६३२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (जि.ठाणे) येथील ग्रामविकास अधिकारी रजेवर असल्याने शेकडो घरकुलांची कामे बंद असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून निधी मिळत नसल्याने घरकुलांची कामे अर्धवट राहिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐन पावसाळयात घरकुलांची कामे अर्धवट राहिल्याने लाभार्थ्यांना रस्त्यावर रहावे लागत असून लाभार्थ्यांनी ठेकेदारांकडून उर्वरित काम पूर्ण करुन द्यावे अन्यथा येत्या सात दिवसात ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने घरकुलांची कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांना मारहाण झाल्याबाबत

(७१) * ४२८३० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयात "मार्ड" च्या दोन निवासी डॉक्टर व परिचारिका यांना रुग्णाच्या नातेवाईकांनी मारहाण करुन त्यांना रुग्णालयात भरती केल्याची घटना दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांवर होत असलेले हल्ले थांबविण्यासाठी त्यांना सरंक्षण देण्याबाबत शासनाने आश्वासने देऊनही त्यांना संरक्षण देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेच्या दिवशी सदर रुग्णालयात सुरक्षाविषयक कोणती व्यवस्था होती, घटनेला प्रतिबंध करण्यास ही व्यवस्था पुरेशी होती काय, तसेच या घटनेच्या निषेधार्थ जे. जे. समूहातील डॉक्टरांनी काम बंद केलेल्या आंदोलनाला जी.टी. रुग्णालय, कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालयातील ४५० हून अधिक निवासी डॉक्टरांनी काम बंद आंदोलनाला पाठिंबा दिला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांच्या मागण्या काय आहेत व सदर मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व भविष्यात अशा घटना घडू नयेत तसेच डॉक्टरांच्या मागण्यांची पूर्तता करणेबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) होय.

(२) नाही.

(३) सदर घटनेच्या दिवशी रुग्णालयामध्ये महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे ८९ सुरक्षारक्षक तसेच रुग्णालय प्रशासनाचे ७९ सुरक्षारक्षक तैनात होते.

सदर घटनेच्या निषेधार्थ जे.जे.समुह रूग्णालयातील डॉक्टरांना पाठिंबा देण्याकरीता जी.टी. हॉस्पीटल, कामा रूग्णालय व सेंट जार्जेस रूग्णालयातील निवासी डॉक्टरांनी काम बंद आंदोलन सुरु केले ही बाब खरी आहे.

(४) निवासी डॉक्टरांनी सर्व रुग्ण कक्षामध्ये अलार्म सिस्टिम लावणे, ४५ वाढीव सुरक्षारक्षक नियुक्त करणे व रुग्णांस भेटण्याच्या वेळाचे काटेकोरपणे पालन करणे अशा विविध मागण्या केल्या आहेत.

शासन व रुग्णालय प्रशासनामार्फत निवासी डॉक्टरांनी केलेल्या मागण्यांची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) सदर प्रकरणी संस्थास्तरावरुन चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीत रुग्ण कक्षात अनावश्यक नातेवाईक असल्याचे आढळून आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून तैनात करण्यात आलेले सुरक्षा रक्षक व जे.जे.समुह रुग्णालयातील नियमित सुरक्षारक्षक यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे.

उक्त प्रकरणी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार रुग्णालयामध्ये दाखल रुग्णांना भेटण्याकरीता पास सिस्टिम सुरु करण्यात आली असून दोन पेक्षा अधिक नातेवाईकांना प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच निवासी डॉक्टरांच्या मागणीनुसार अतिरिक्त सुरक्षा बल तैनात करण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.

औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (घाटी) परिसरात अस्वच्छता निर्माण झाल्याबाबत

(७२) * ४२९७३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (घाटी) परिसरातील मेडिसीन इमारतीमध्ये अत्याधुनिक सुविधासह हृदयविकार, मधुमेह, डेंग्यू, मलेरिया ताप आणि इतर आजारांवर औषधोपचार केले जात असून येथे जनरल वॉर्डसह विशेष वॉर्डाची सोय असलेल्या या इमारतीत ड्रेनेजचे पाणी साठून अस्वच्छता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्वच्छ असलेल्या या दवाखान्याच्या दुरवस्थेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) व (२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद (घाटी) येथील इमारतीमधील ड्रेनेज सिस्टीममध्ये झालेला बिघाड सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्त करुन सदर ड्रेनेज सिस्टीम पूर्ववत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर संस्थेच्या इमारतीमध्ये घाणीचे साम्राज्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पूर्व विदर्भातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी निधी मिळण्याबाबत

(७३) * **४३३९४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला मागील दोन वर्षात १३४ कोटी निधीपैकी फक्त ५९ कोटी ६४ लाखांचा निधी मिळाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन स्थळांच्या विकासासाठी सन २०१६-१७ या वर्षात ८२ कोटी ५४ लाख रूपये मंजूर केला असून त्यातून फक्त ५१ कोटी ६८ लाखांचा निधी मिळाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी ४२ कोटी ११ लाखाचा निधी मंजूर केला असून त्यातील ६ कोटी ६३ लाखाचा निधी मिळणे, वर्धा जिल्ह्यासाठी १८ कोटी ५३ लाखाचा निधी मंजूर केला असून त्यातील २ कोटी ६५ लाखाचा निधी मिळणे, चंद्रपूर जिल्ह्याला ११ कोटी २५ लाखाच्या निधीची तरतूद केली असून त्यातील १ कोटी ८५ लाखाचा निधीच वितरित केला असणे, नागपूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकासासाठी ७ कोटी ८५ लाखाचा निधी मंजूर केला त्यातील फक्त १ कोटी ७५ लाख रूपयांचा निधी वाटप करण्यात येणे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पूर्व विदर्भातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी संपूर्ण निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) व (२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पूर्व व पश्चिम विदर्भ यानुसार कार्यक्षेत्र अस्तित्वात नसून नागपूर प्रादेशिक विभाग व अमरावती प्रादेशिक विभाग (महसूल विभाग) अशी कार्यक्षेत्रे आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास विभागनिहाय मागील २ वर्षात मंजूर व प्राप्त झालेल्या निधीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

(रुपये लाखात)

अ.क्र.	विभाग	वर्ष				एकूण मंजूर निधी	एकूण प्राप्त निधी
		२०१६-१७		२०१७-१८			
		मंजूर निधी	प्राप्त निधी	मंजूर निधी	प्राप्त निधी		
१	नागपूर प्रादेशिक विभाग	४४१५.३३	१०८२.४०	१९८१.३३	५१२.८८	६३९६.६६	१५९५.२८
२	अमरावती प्रादेशिक विभाग	४१९०.७६	५१०.००	४९.५४	२०.००	४२४०.३०	५३०.००

(३) नागपूर प्रादेशिक विभागातील जिल्ह्यातील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास मंजूर जिल्हानिहाय प्राप्त झालेल्या निधीचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

(रुपये लाखात)

अ.क्र.	जिल्हा	वर्ष				एकूण मंजूर निधी	एकूण प्राप्त निधी
		२०१६-१७		२०१७-१८			
		मंजूर निधी	प्राप्त निधी	मंजूर निधी	प्राप्त निधी		
१	नागपूर	--	--	४९४.०५	५०.००	४९४.०५	५०.००
२	वर्धा	३८९.८५	५०.००	--	--	३८९.८५	५०.००
३	चंद्रपूर	३५३३.००	९३२.४०	निरंक	निरंक	३५३३.००	९३२.४०
४	भंडारा	४९२.४८	१००.००	--	--	४९२.४८	१००.००
५	गोंदिया	--	--	१४८७.२८	४६२.८८	१४८७.२८	४६२.८८
६	गडचिरोली	--	--	--	--	--	--
एकूण नागपूर प्रादेशिक विभाग		४४१५.३३	१०८२.४०	१९८१.३३	५१२.८८	६३९६.६६	१५९५.२८

(४) व (५) निधीची उपलब्धता व कामाच्या प्रगतीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील रुग्णांना एमआरआय तपासणीसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याबाबत

(७४) * **४१२३८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३७९३३ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) अत्यवस्थ रुग्णांना वगळता इतर संवर्गातील रुग्णांना एमआरआय तपासणीसाठी दोन महिन्यानंतरचा दिनांक रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआरआयसाठी मोठी प्रतिक्षा यादी असल्याने रुग्णांचे खाजगी रुग्णालयात जास्त पैसे भरुन एमआरआय काढावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एमआरआयकरीता येणाऱ्या रुग्णांची प्रतिक्षा यादी कमी करण्यासाठी व रुग्णांची आर्थिक फसवणूक थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लागू नाही.

राज्यात विमुक्त जाती, भटक्या जमाती विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या आश्रमशाळांना सेवक संच निश्चित करणेबाबत

(७५) * ४१४०४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विमुक्त जाती, भटक्या जमाती विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या आश्रमशाळांना खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांप्रमाणे आश्रमशाळा संहिता लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा संहितेप्रमाणे या शाळांची सन २०१७-१८ ची सेवक संच निश्चिती अद्यापपर्यंत झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेवक संच निश्चिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) या नवीन विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विजाभज आश्रमशाळांसाठी नवीन आश्रमशाळा संहिता तयार करण्यात आली आहे.
(२) सन २०१७-१८ ची संचमान्यता करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय दंत महाविद्यालयाच्या वसतिगृहास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(७६) * ४१८३९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे मराठवाड्यातील एकमेव शासकीय दंत महाविद्यालय असून पाच वर्षापूर्वी दंत महाविद्यालयाचे वसतिगृहाचे काम सुरु झाले असून निधीअभावी ते पूर्णत्वाकडे जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय दंत महाविद्यालयाचे वसतिगृहाचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित कामासाठी रुपये २ कोटी ६५ लाख आवश्यक असून मा.अर्थमंत्री यांनी आश्वासन देऊन सुध्दा अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृहासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात रुपये ८०.०० लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नंडोरे (जि.पालघर) येथील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना दुसरा हप्ता देण्याबाबत

(७७) * ४१९०८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंडोरे (जि.पालघर) ग्रामपंचायतीमधील बसवत पाड्यातील १७ वर्षात मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम अद्यापी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तालुक्यातील अन्य ११३८ मंजूर घरकुल लाभार्थ्यांना किती कालावधीत घरकुलाचा दुसरा हप्ता देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

इगतपुरी (जि.नाशिक) शहराजवळ रानडुकरांचा वावर वाढल्याबाबत

(७८) * ४३०७९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) शहराजवळील नांदगाव सदो, फांगुळगाव आणि मानवेडे रस्त्यावर रानडुकरांचे प्रमाण वाढले असल्याने या रानडुक्करांचा कळप रस्त्यावर येऊन पादचारी, वाहने यांना धडक देत असल्याने परिसरातील अनेक महिला पुरुष जखमी झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनांमुळे नागरिक भयभीत झाले असून रानडुकरांचा वन विभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर पाटबंधारे विभागांतर्गत गावातील शेतकऱ्यांना वर्धा नदीचे व कालव्याचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याबाबत

(७९) * **४२५२० श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर पाटबंधारे विभागांतर्गत नकोडा, घुग्घुस व चारगांव येथील शेतकऱ्यांना वर्धा नदीचे व कालव्याचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून न देता उद्योगांना देण्यात आल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केल्याचे दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) येथील ग्रामस्थांना नदीपात्रातून प्रवासासाठी होडीची सुविधा सुरु करण्याबाबत

(८०) * **४३३०२ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळा-मुठा नद्यांच्या संगमावर वसलेल्या मौजे सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) येथून नदी पलिकडील मौ.सानापुर (पानशेत नजीक) या गावी जाण्या-येण्यासाठी ग्रामस्थांना नदीपात्रातून नावेची (होडी) सुविधा अनेक वर्षे पुणे जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नदीपात्रातील नावेची सुविधा जिल्हा परिषदेने बंद केल्यामुळे नदीच्या अलिकडील व पलिकडील ग्रामस्थांना तसेच अन्य रहिवाशांना खडकवासला धरणमार्गे पानशेतकरीता उलटसुलट प्रवास करावा लागत असल्यामुळे नावेची (होडी) सुविधा पुन्हा सुरु करण्यात यावी अथवा नदीवर पुल बांधण्यात येऊन होणारा त्रास दूर करावा अशी मागणी ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे व मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे मागील अनेक दिवसांपासून केल्याचे दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

वांझोळे स्टॉप ते गावकरवाडी ग्रामदेवता (ता.संगमनेर, जि.रत्नागिरी) मंदिरापर्यंतच्या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाबाबत

(८१) * ४३१५५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांझोळे स्टॉप ते गावकरवाडी ग्रामदेवता (ता.संगमनेर, जि.रत्नागिरी) मंदिरापर्यंतच्या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१७-१८ च्या पुरक आराखड्यात समाविष्ट करण्यात आले असून सदर रस्त्याच्या प्रस्तावाच्या सुरु असलेल्या कार्यवाहीचे काम पूर्ण झाले आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रस्त्याचा प्रस्ताव पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) वांझोळे स्टॉप ते गावकरवाडी ग्रामदेवता (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) मंदिरापर्यंतच्या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१७-१८ च्या पूरक आराखड्यात समाविष्ट करण्यात आले आहे. सदर रस्त्याचा प्रस्ताव तयार करणेकामी जागेचे बक्षिसपत्र, दानपत्र करुन घेणेची कार्यवाही सुरु आहे. सदर रस्त्याची नोंद नमुना नं. ३ ला घेण्यात आली आहे. तथापि, सर्व जमिनीदारांचे संमती/बक्षिसपत्र ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाहीत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांवरील कार्यवाही प्रलंबित असल्याबाबत

(८२) * ४२८१९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोणतेही काम पूर्ण झाल्यावर काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी लेखापरीक्षण कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काम पूर्ण झाल्याबद्दल संबंधित विभागाकडून प्रमाणपत्र (युटीलायझेशन सर्टिफिकेट) मिळणे आवश्यक असताना सन २०१४-१५ पासून ६० हजार कोटीच्या खर्चाची कामे पूर्ण झाल्याची प्रमाणपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत, तसेच, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या ६ हजार आक्षेपांना शासनाकडून उत्तरेही देण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या ६ हजार आक्षेपांना शासनाकडून उत्तरच देण्यात न आल्याप्रकरणी तसेच काम पूर्ण झाल्याबद्दल संबंधित विभागाकडून प्रमाणपत्र (युटीलायझेशन सर्टिफिकेट) सादर न करण्यासंबंधी जबाबदारी निश्चित करून संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) होय. मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या नियम १४९-परिशिष्ट २२ अन्वये लेखा परीक्षण कार्यालयास उपयोगिता प्रमाणपत्रे पाठविणे आवश्यक आहे.

(२) शासकीय काम पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्रे काम करणाऱ्या संबंधित विभागांकडून महालेखापाल कार्यालयास सादर केली जातात.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६ च्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालानुसार सन २०१३-१४ पर्यंतची रूपये २८८५४.२१ कोटी, सन २०१४-१५ मध्ये रूपये ६८२४.८१ कोटी आणि सन २०१५-१६ मध्ये रूपये २७४१०.२० कोटी अशी एकूण रुपये ६३०८९.२२ कोटी एवढया रकमेची विविध मंत्रालयीन विभागांची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत.

तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१/३/२०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्रावरील अहवालानुसार जून, २०१७ पर्यंत ३६९३ निरीक्षण अहवाल (१३६२१ परिच्छेद) प्रलंबित होते.

(३) प्रलंबित निरीक्षण अहवाल प्रधान महालेखाकार कार्यालयाकडून संबंधित प्रशासकीय विभागांकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात. सदर अहवालावर कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांची आहे.

प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास विहित कालावधीत सादर करण्याच्या व प्रलंबितता कमी करण्याच्या सूचना वित्त विभागामार्फत वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अलीकडेच दिनांक १८/१२/२०१७ च्या परिपत्रकान्वये याबाबत पुन्हा एकदा सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर प्रमाणपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्यास संबंधितांविरूध्द करावयाच्या कार्यवाहीबाबत देखील प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील काळवटी साठवण तलावाची उंची वाढविण्याबाबत

(८३) * ४२६३३ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील काळवटी साठवण तलावाची उंची दोन मीटरने वाढवावी याकरीता सन २०१६ मध्ये शासनाने प्रशासकीय मान्यता देवून निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे आदेश अद्यापही प्राप्त झाले नसल्याने कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबाजोगाई शहराला सध्या काळवटी साठवण तलावातून पाणीपुरवठा होतो परंतु, हा पाणीपुरवठा अतिशय अपुरा असल्यामुळे शहराला केवळ सहा महिनेच पिण्याचे पाणी मिळते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, काळवटी साठवण तलावाचे काम सुरु करण्यासंदर्भातील कामाचे आदेश काढण्याबाबत व निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) शासन पत्र क्र.मजनिप्रा-२०१६/५७/३३/२०१६जसंअ, दिनांक १२/७/२०१६ अन्वये वाण प्रकल्पाचे पाणी वापराबाबतचे फेर नियोजन करुन यास सक्षमस्तरावरील मंजूरी प्राप्त करुन घेणे या अटीच्या अधिन राहून उंची वाढविण्याबाबत मान्यता प्रदान केली होती.

वरील शासन निर्देशाप्रमाणे वाण प्रकल्पाचे पाणी वापराचे फेर नियोजन करुन प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला. या प्रस्तावास शासन पत्र क्र. २०१६/३३/२०१६/जसंअ, दिनांक ४/६/२०१८ अन्वये वाण प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील ५० हे. क्षेत्रात नागरीकरण व औद्योगिकरणामुळे झालेल्या पाणी वापरातील घटीमुळे ०.२६ द.ल.घ.मी. अतिरिक्त क्षमतेने पाणी साठा करण्यासाठी मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांचे कडून दृढीकरण करुन घेणे या अटीचे अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. उंची वाढीस अद्याप प्रशासकीय मान्यता नाही. त्यामुळे यासाठी निधी मंजूर करण्यात आला नाही.
(२) होय.

शासनाने दिनांक ४/६/२०१८ रोजी दिलेल्या मान्यतेप्रमाणे क्षेत्रियस्तरावर अटींची पूर्तता करणे प्रगतीपथावर आहे. त्यामुळे कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली नाही.
(३) अंबाजोगाई शहराची कायम स्वरूपाची पाणीपुरवठा योजना ही मांजरा धरणातील पाणी साठ्यातून कार्यान्वित आहे. परंतु ती अपुरी असल्यामुळे काळवटी धरणातून सुध्दा पाणीपुरवठा केला जातो. परंतु ती सुध्दा अपुरी आहे. गेली आठ वर्षापासून मार्च महिन्यानंतर मांजरा धरणात अत्यल्प पाणी साठा असल्याने पाणीपुरवठा योजना बंद होतात.

(४) शासनाच्या दिनांक ४/६/२०१८ च्या मान्यतेप्रमाणे काळवटी साठवण तलाव उंची वाढवणेबाबत अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीत आहे. मान्यतेच्या पत्रातील तरतुदीप्रमाणे शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता तसेच नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. निधी प्राप्त होताच निविदा कार्यवाही पूर्ण करुन उंची वाढवण्याचे काम हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील प्रसूती विभागाच्या समस्येबाबत

(८४) * ४२४११ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात प्रसूती विभागाची अवस्था वाईट झाली असून प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांसाठी जागा अपूरी पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांच्या वाढत्या संख्येने रुग्णालयाच्या व्यवस्थापनेवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असून रुग्णांना योग्य सोयीसुविधा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांची वाढती संख्या लक्षात घेता प्रशस्त हॉल त्याची दुरुस्ती व तेथील स्वच्छता ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) व (२) नाही.

(३) संस्थेत उपलब्ध व्यवस्थांच्या माध्यमातून प्रसुतीकरीता येणाऱ्या रूग्णांना आवश्यक ते औषधोपचार करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) लागू नाही.

राज्यात वन विभागाच्या नामंजूर आणि कायमस्वरूपी अशा दोन्ही प्रकारच्या प्रमाणकांमुळे निधीची वसुली प्रलंबित असल्याबाबत

(८५) * ४१४३७ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागाच्या नामंजूर आणि कायमस्वरूपी अशा दोन्ही प्रकारचे प्रमाणक वाढल्याने कोट्यवधी निधीची वसुली प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनक्षेत्र अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी या माध्यमातून निधीचा गैरवापर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागात कायमस्वरूपी नामंजूर प्रमाणके हा प्रकार असून यात कामासाठी अंदाजपत्रकात कोणतीही तरतूद नाही, मोक्यावर कामे केल्याची प्रमाणके तयार करून खोटे हिशेब तयार केले जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) हे अंशतः खरे आहे,

वन विभागात अंदाजे रुपये १.६४ कोटी रकमेचे तात्पुरत्या स्वरुपात नामंजूर प्रमाणके व अंदाजे रुपये १.३४ कोटी रकमेचे कायमस्वरुपी नामंजूर प्रमाणके असे एकूण अंदाजे रुपये २.९८ कोटी रकमेचे प्रमाणके नामंजूर आहेत. त्यापैकी रूपये ३९,२७,१८९/- इतकी रक्कम संबंधितांकडून आतापर्यंत वसूल करण्यात आलेली आहे. तथापी सदर बाब माहे मे, २०१८ मध्ये निदर्शनास आलेली नसून वेळोवेळी लेखापरिक्षणात निदर्शनास आलेली आहे.

(२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.

ज्या प्रकरणात निधीचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आले किंवा खोटे प्रमाणके तयार केल्याचे निदर्शनास आले त्या प्रकरणात संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात येते. काही प्रकरणात विभागीय चौकशी सुरू आहे. ज्या ठिकाणी मापदंडानुसार कामे झालेली नाहीत असे चौकशीअंती आढळून आले आहे तसेच अतिरिक्त किंवा नियमबाहय खर्च झाला आहे, अशा प्रकरणात प्रमाणके कायमस्वरुपी नामंजूर करण्यात येवून संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून नामंजूर प्रमाणकाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येते. नामंजूर प्रमाणकांसाठी अंदाजपत्रकात कोणतीही तरतूद करणे आवश्यक नाही. आतापर्यंत रूपये ३९,२७,१८९/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

(५) नामंजूर प्रमाणका संदर्भात निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अंतर्भूत असलेली चौकशी/पडताळणी करणे व अनुषंगीक बाब इत्यादी मध्ये लागणारा वेळ विचारात घेता विलंब झालेला नाही.

विष्णुपूरी (जि.नांदेड) येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना रस्त्यावर सोडल्याबाबत

(८६) * ४२२१० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील विष्णुपूरी येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेणाऱ्या दोन रुग्णांना गोदावरी नदीकाठी बंदाघाट येथील रस्त्यावर सोडल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णांपैकी एकाचा रस्त्यावर उन्हाच्या तापमानात वाढ झाल्याने मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील सेंट जॉर्ज व सर जे.जे. रुग्णालयात अंशकालीन पदे कायम भरण्याबाबत

(८७) * **४३५७३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सेंट जॉर्ज व सर जे.जे. रुग्णालयात अंशकालीन पदे कायमस्वरुपी भरण्याचा आकृतिबंध मंजूर असतांनाही, मागील १५-२० वर्षापासून रुपये ४५०/- इतक्या अल्प वेतनावर काम करणाऱ्या सहा अंशकालीन महिलांना सेवेत कायम करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी पत्र देवूनही महिलांना शासन सेवेत कायम केले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये जे.जे. रुग्णालयातील ७७४ बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले असताना उक्त सहा अंशकालीन महिलांना शासन सेवेत कायम न करण्याची व कायम करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंशकालीन कर्मचाऱ्यांना वाढत्या वयामुळे कुठेही नोकरी मिळणार नसल्याने, तसेच सध्याच्या महागाईत कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्याच्यादृष्टीने त्यांना सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर मागणीसंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

इचलकरंजी येथील जवाहरनगर परिसरातील रुग्णालयामध्ये अर्भकांची बेकायदा विक्री होत असल्याबाबत

(८८) * ४३५३३ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी येथील जवाहरनगर परिसरातील डॉ.अरुण पाटील यांच्या रुग्णालयामध्ये अल्पवयीन व विधवा मातांची प्रसूती करुन अर्भकांची बेकायदा विक्री केली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) व (३) संबंधित प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे दिनांक ०७/०२/२०१८ रोजी गुन्हा क्र. ३०/२०१८ दाखल केलेला आहे. याबाबत भा.दं.वि.कलम ३७०, १७६ आणि ३४ तसेच बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम ७५, ८० व ८१ नुसार गुन्हा दाखल आहे. वरीलप्रमाणे तपासात डॉ. अरूण पाटील, सौ. उज्जवला अरूण पाटील, अनिल दशरथ चहांदे, सौ.प्रेरणा अनिल चहांदे यांचेवर वरील कलमानुसार कारवाई करणेत आली. तसेच संबंधित हॉस्पिटल डॉ.अरूण पाटील यांचा मुलगा ऋषीकेश पाटील यांचे नावे नोंद असलेने दिनांक १३/०४/२०१८ रोजी सहआरोपी यांना त्याने त्यांचेवरही कायदेशीक कारवाई करणेत आलेली आहे. संबंधितबाबत सखोल व विशेष तपास व्हावा यासाठी उपविभागीय अधिकारी, जयसिंगपूर यांना विशेष तपास अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.